अहवाल क्रमांक : १६३

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिति

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील चौथ्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल**

# चौथा अनुपालन अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २० जुलै, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, नागपूर.

२०१८

## पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील चौथ्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल**

# चौथा अनुपालन अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री.राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रितः**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. * श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१४. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१६. श्री. अमित झनक, वि.स.स.

१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

२४. ** रिक्त

२५. ** रिक्त

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी पासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | **जिल्हा परिषद, हिंगोली** | |
| (१) | एक | हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत | १ |
| (२) | दोन | हिगोंली जिल्हा परिषदेतंर्गत गैरव्यवहाराची प्रकरणे | ५ |
| | | **जिल्हा परिषद, पुणे** | |
| (३) | तीन | मौजे चांबळी, ता. पुरंदर येथील दलित वस्ती सुधार योजनेबाबत | १० |
| (४) | चार | मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेबाबत | १४ |
| (५) | पाच | जिल्हा परिषदेचे विभाग प्रमूख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहत नसल्याबाबत | २० |
| (६) | सहा | ग्रामसेवक व शिक्षकांसह इतर कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत | २९ |
| (७) | सात | भारत निर्माण योजनेचे काम अपुर्ण असल्याबाबत | ३८ |
| (८) | आठ | नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमितता | ४७ |
| (९) | नऊ | गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करणेबाबत | ५४ |
| | | **परिशिष्ट** शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ६७ |

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन तेराव्या विधानसभेतील समितीच्या चौथ्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी चौथा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

सन२०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रितवित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous rangeand complexity) लक्षात घेतला विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration ) मा. सभापती, विधान परिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधान मंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature)या समितीला' Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात. त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तर दायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षे बाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारक रितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्यावेळी केलेले आहे.एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्य पद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने `अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाय योजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्य साधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता वगैर व्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्याबाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१५-२०१६ करीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा चौथा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांस दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्टांमध्ये समावेश केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने हिंगोली जिल्हा परिषदेसंदर्भात दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ व पुणे जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ व दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही विचारात घेतल्यानंतर समितीच्या अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. विजयकुमार, प्रधान सचिव, कृषी विभाग, श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,श्री.श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. चं. प्र. जोशी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. डी. एल. सुळ, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. प्रकाश वळवी, उपसचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. म. म. सावंत, उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. कि. पा. वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग, श्री. विशाल सोळंकी, आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे, श्री. पी. एस. कवटे, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे, डॉ. विजय भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा तसेच श्री. प्रताप मोहिते व श्री. ज. र. मेनन, संचालक, स्थानिक लेखानिधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समितीत्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची ही आभारी आहे.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक–जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांकः जुलै, २०१८.

**सुधीर पारवे**
समितीप्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | **जिल्हापरिषद ,हिंगोली** | |
| (१) | एक | हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत | |
| (२) | दोन | हिगोंली जिल्हा परिषदेतंर्गत गैरव्यवहाराची प्रकरणे | |
| | | **जिल्हापरिषद ,पुणे** | |
| (३) | तीन | मौजे चांबळी ता. पुरंदर येथील दलित वस्ती सुधार योजनेबाबत | |
| (४) | चार | मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेबाबत | |

**परिशिष्ट**

शासनाचे आदेश व परिपत्रके आणि
समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

प्रकरण एक

## जिल्हापरिषद, हिंगोली (प्रशासन)

### हिंगोली जिल्हा परिषदे मध्ये वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २००८-०९ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालावरील साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ अधिका-यांची व कर्मचा-यांची बरीच पदे रिक्त आहेत. अतिरिक्त सीईओ, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी इत्यादींची पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामामध्ये अनियमितता होत आहे.

समितीच्या मते शासनाने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद योग्य चालविणे समितीची किंवा मुख्यकार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे, तशीच ती शासनाची ही आहे म्हणुन शासनाने मदत केली पाहिजे. वर्ग-१ ची ५० टक्के पदे रिक्त आहेत. कर्मचा-यांची ५० टक्के पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेचे कामकाज योग्य रितीने व जलद गतीने होण्याकरिता अधिकारी/कर्मचा-यांची आवश्यकता असते. शासनाने याबाबतची गांभीर्याने दखल घेऊन या जिल्हा परिषदेतील अधिकारी/कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत साक्षीस उपस्थित असलेले श्री. शिंदे, सहसचिव, ग्रामविकास विभाग यांनी तातडीने कार्यवाही करावी असे समितीने सांगितले असता श्री. शिंदे (सहसचिव, ग्राम विकास विभाग) यांनी समितीस आश्वासित केले की समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे हिंगोली जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की एकूण किती पदे रिक्त आहेत, यावर समितीस अशी माहिती देण्यात आली की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी डीआरडीए, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, डीएचओ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) इत्यादी पदे रिक्त असू न वर्ग २-३ संवर्गातील अनेक पदे रिक्त आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमध्ये अनेक पदे रिक्त असून या संदर्भात माहिती देण्यात यावी. हिंगोली जिल्हा परिषदेमधील प्रत्येक विषयामध्ये अनियमितता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. बैठकीला संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत. पदे रिक्त असल्यामुळे अनियमितता होत आहे, असेही निदर्शनास येते.

समितीने जिल्हा परिषद अधिका-यांना अशी विचारणा केली की, हिंगोली जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदे दोन महिन्यामध्ये भरणे आवश्यक आहे. या कालावधीतही पदे भरण्यात येतील असे आश्वासन सहसचिव देऊ शकतील काय, यावर सह सचिव यांनी समितीस असे उत्तर दिले की, विविध विभागातील पदे रिक्त आहेत. ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील पदांच्या भरती संदर्भात ग्राम विकास विभागाच्या प्रधान सचिवांना माहिती देऊन सदरहू पदे लवकरात लवकर भरण्याबाबत प्रयत्न केला जाईल. इतर विभागाची पदे भरण्याबाबत समितीची शिफारस त्या विभागाकडे पाठविण्यात येईल.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्राम विकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गाअंतर्गत पदे रिक्त आहेत ती तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ च्या अधिका-यांची १२३ पदे मंजूर असून ९५ पदे भरलेली आहेत. तर आज रोजी २८ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या २८ पदांची विभाग व पदनिहाय स्थिती खालील प्रमाणे आहे. सदरची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद हिंगोली कार्यालयाकडून शासनाच्या संबंधित विभागांना केलेल्या पाठपुराव्याचे विवरण सोबत जोडले आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदाचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सा.प्र.वि. | अति.मु.का.अ. | १ |
| २ | | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. | १ |
| ३ | | उपमु.का.अ. (सा.प्र.) | १ |
| ४ | बांधकामविभाग | उपअभियंता (बांधा) वसमत | १ |

**विवरण**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ | लघुसिंचन विभाग | उप कार्यकारी अभियंता | १ |
| ६ | ग्रा.पा.पु.विभाग | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) | १ |
| ७ | | उप अभियंता (ग्रापापु) | १ |
| ८ | | उप अभियंता (यांत्रिकी) | १ |
| ९ | आरोग्य | अति. जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| १० | | सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| ११ | | तालुका आरोग्य अधिकारी | २ |
| १२ | | वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र | ५ |
| १३ | पशुसंवर्धन विभाग | पशुधन विकास अधिकारी | ३ |
| १४ | कृषीविभाग | कृषी विकास अधिकारी | १ |
| १५ | शिक्षण | शिक्षणाधिकारी(माध्य.) | १ |
| १६ | जि.ग्रा.वि.यं. | स. प्र. अधिकारी पाणलोट | १ |
| १७ | | उप अभियंता जि.ग्रा.वि.व. | १ |
| १८ | | उप अभियंता PMGSY | १ |
| १९ | प्र.मं.ग्रा.स. योजना | कार्यकारीअभियंता,स.शि.अ. | १ |
| २० | सर्व शिक्षा अभियान | उपअभियंता (यांत्रिकी) | १ |
| | | एकूण | २८ |

**उपरोक्त मुद्दयाबाबत ग्रामविकास विभागाकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

हिंगोली जिल्हा परिषदेअंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गात ०९ पदे मंजुर असून ०६ पदे भरली आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. ही दोन पदे तदर्थ पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. उप मु.का.अ.(सा.) हे पद सरळ सेवा/पदोन्नती/बदलीने भरण्यात येत आहे. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP), एकात्मिक पडिक जमीन विकास कार्यक्रम (WDP), हरियाली इत्यादी कार्यक्रम संपुष्टात आल्यामुळे व सद्यःस्थितीत बहिर्गमन प्रक्रिया (Exitprotocol) अंतिम टप्यात असल्यामुळे सदर कार्यक्रमाकरिता निर्माण केलेला अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता नसल्याने पाणलोट प्रकल्पासाठीच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी (कृषी) या पदावर कार्यरत असणा-या अधिका-यांच्या सेवा मूळ विभागाकडे प्रत्यावर्तीत करण्यात आल्या आहेत/येत आहेत. त्यामुळे जि.प. हिंगोली सदर रिक्त असलेले पद भरण्यात येणार नाही.

उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद, हिंगोली मार्फत संबंधित प्रशासनिक विभागाकडे पाठ पुरावा सुरू आहे.

**हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.**

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २००८-०९ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ अधिका-यांची मोठया प्रमाणावर पदे रिक्त आहेत. यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी यांचा समावेश आहे. उपरोक्त पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे हिंगोली जिल्हा परिषदेचे प्रशासन कोलमडण्याच्या स्थितीवर आहे. जिल्हा परिषदेचे कामकाज योग्यरीतीने व

जलदगतीने होण्याकरिता अधिका-यांची आवश्यकता असते. शासन याबाबतची गांभीर्याने दखल घेऊन या जिल्हापरिषदेतील अधिकारी व कर्मचा-याची पदे भरण्याबाबत हिंगोली जिल्हा भेटीच्या वेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले सहसचिव, ग्रामविकास विभाग यांनी तातडीने कार्यवाही करावी आणि या जिल्हापरिषदेतील सर्व रिक्त पदे भरण्याबाबतचा अहवाल समितीत द्यावा असे निदेश दिले होते.

या प्रकरणी जिल्हा परिषदेकडून लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ च्या अधिका-यांची १२३ पदे मंजूर असून ९५ पदे भरलेली आहेत. तर आज रोजी वर्ग-१ च्या अधिका-यांची सुमारे २८ पदे रिक्त आहेत. यामध्ये सामान्य प्रशासन विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग शिक्षण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, सर्व शिक्षा अभियान इत्यादी विभागातील अधिका-यांचा समावेश आहे. सदरची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद हिंगोली यांच्या मार्फत संबंधित प्रशासनिक विभागाकडे पाठ पुरावा सुरु असल्याचे उक्त लेखी माहितीत नमूद केले आहे.

समितीला हिंगोली जिल्हा परिषदेतील अधिका-यांची इतकी मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे इतरत्र कोठेही आढळून आली नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी गेल्या ४ महिन्यांपूर्वीच या जिल्हा परिषदेत रुजू झाल्याने तसेच अनेक विभाग प्रमुखांची नियुक्त्या जिल्हा परिषदेत केली नसल्यामुळे बहुतेक विभागाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-याकडे सोपविला आहे, त्यामुळे साहजिकच या अधिका-यांवर कामाचा प्रचंड प्रमाणात तणाव असल्याचे समितीला जाणवले आहे. विभाग प्रमुखाचे पद हे एक ते दीड महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त राहू नये. तसेच कधी एखादे पद लगेच भरणे शक्य नसेल तर अशा पदाचा अतिरिक्त कार्यभार हा समकक्ष अधिका-याकडे सोपविणे इष्ट वाटते. तथापि, या जिल्हा परिषदेमध्ये सदर बाबींचे पालन केल्याचे आढळून येत नाही.समिती उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता असे निदेश देते की, शासनस्तरावर प्रलंबित असलेली रिक्त पदे भरण्याबाबतचे विविध प्रलंबित प्रस्ताव संबंधित विभागाने तातडीने निकाली काढून या जिल्हा परिषदांमधील विभागप्रमुखांची पदे तसेच वर्ग-१ अधिका-यांची पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच सदरची रिक्त पदे कोणत्याही परिस्थितीमध्ये येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण पणे भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा. पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे रिक्त असलेल्या वर्ग १ च्या २८ पदांपैकी सद्यःस्थितीत अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), उप अभियंता बां, वसमत, उप कार्यकारी अभियंता (लघुसिंचन), तालुका वैद्यकीय अधिकारी-१, वैद्यकीय अधिकारी-२ पदे, कृषी विकास अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्य.), उप कार्यकारी अभियंता PMGSY, उप कार्यकारी अभियंता सर्व शिक्षा अभियान अशी एकुण १० पदे भरण्यात आलेली आहेत.

उर्वरित पदे भरण्यासाठी शासनास जिल्हा परिषद हिंगोली कार्यालयाकडून पत्र दिनांक १.८.२०१५, दिनांक १२.८.२०१५, दिनांक २०.८.२०१५, दि. ०२/०९/१५, दि. ०५/०९/१५, दि. ०७/०९/१५, दि. ०५/१०/१५, दि. २२/०१/१६, दि. ०६/०६/२०१६, दि. ०८/०६/१६, दि. १२/०५/१७, १९/०१/१८, २५.०५.१८ अन्वये संबंधित विविध मंत्रालयीन विभागांकडे पाठ पुरावा करण्यात आलेला आहे. तसेच मा. पंचायत राज समितीने निर्देशित केल्याप्रमाणे रिक्त पदाचा पदभार सम कक्ष पदाच्या इतर अधिका-यांकडे सोपविला जात आहे व याची दक्षता घेण्यात येत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद, हिंगोली येथील अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं., आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) ही ३ पदे अनुक्रमे दिनांक १०.०२.२०१६, ०७.१२.२०१५ आणि दिनांक २८.१२.२०१५ च्या आदेशान्वये भरण्यात आली आहेत. आज दिनांक १६.०५.२०१७ रोजी जिल्हा परिषद हिंगोलीमध्ये महाराष्ट्र विकास सेवेतील एकही पद रिक्त नाही.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. हिंगोली मध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्य)१, उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) १, उप अभियंता (यां) २, सहायक भूवैज्ञानिक १, कनिष्ठ भूवैज्ञानिक २ची पदे रिक्त आहेत. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व उप

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ही पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व उप अभियंता (यां), सहाय्यक भूवैज्ञानिक व कनिष्ठ भुवैज्ञानिकांची पदे भूजल व सर्वेक्षण विकास यंत्रणायांचे मार्फत भरण्यात येतात.

सद्यःस्थितीत उपअभियंता (स्थापत्य) व उपअभियंता (यांत्रिकी) या संवर्गासाठी पदोन्नतीची कार्यवाही विभागास्तरावर सुरु आहे. सदर कार्यवाहीनंतर उपअभियंता (स्थापत्य) व उपअभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील पदे भरण्यात येतील. तसेच इतर सर्व सवंर्गातील पदे भरण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, शासन स्तरावर प्रलंबित असलेली रिक्त पदे भरण्याबाबतचे विविध प्रलंबित प्रस्ताव संबंधित विभागाने तातडीने निकाली काढून या जिल्हा परिषदांमधील विभाग प्रमुखांची पदे तसेच वर्ग-१ अधिका-यांची पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच सदरची रिक्त पदे कोणत्याही परिस्थिती मध्ये येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्णपणे भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. त्यानुसार रिक्त पदे भरली आहेत काय?

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, शिक्षणाधिकारी, प्राथमिक हे पद भरलेले आहे. माध्यमिकचे पद रिक्त आहे. २८ पदे भरली जातील. आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविले आहेत. त्यांच्याकडून मान्यता मिळाली की ती पदेही भरण्यात येतील. यावर समितीने विचारणा केली की, विभागाने सदरहू प्रस्ताव केव्हा पाठविले आहेत, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सामान्य प्रशासन विभागाकडे हे प्रस्ताव पाठवून जवळजवळ १ महिना झाला आहे. खुल्या प्रवर्गातील पदे आम्हाला पदोन्नतीने भरता येतात. यावर समितीने विचारणा केली की, सामान्य प्रशासन विभागाकडून आतापर्यंत काहीच कळविण्यात आलेले नाही का, त्याला आता एक महिना झाला आहे काय?

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, ती सतत प्रक्रिया आहे. आता माध्यमिकचे शिक्षण अधिकारी बदलीने गेले नाही तर ती दोन्ही पदे भरली असती. आता प्राथमिकची पदे भरलेली आहेत व माध्यमिकची पदेही आम्ही पदोन्नतीने भरत आहोत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस भेट दिली असता लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालावरील साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गातील अधिका-यांची व कर्मचा-यांची बहुतांशी पदे रिक्त आहेत त्यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) इत्यादी पदे रिक्त आहेत, त्यामुळे प्रशासनाचे कामकाज योग्यरितीने जलदगतीने होण्यास अडथळा निर्माण होतो. जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार वर्ग-१ च्या अधिका-यांची २८ पदे रिक्त आहेत.

शासन स्तरावर प्रलंबित असलेली रिक्त पदे भरण्याबाबत प्रस्ताव संबंधित विभागाने तातडीने निकाली काढून विभाग प्रमुखांची तसेच वर्ग-१ ची अधिका-यांची पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी अशी समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, जिग्रावियं, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), कृषी विकास अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्य), तालुका आरोग्य अधिकारी-१, वैद्यकीय अधिकारी-२, कार्यकारी अभियंता सर्व शिक्षा अभियान अशी एकूण १० पदे भरण्यात आलेली आहेत. तथापि, अद्याप बहुतांश पदे रिक्त आहेत. त्यामध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्य), उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य),उप अभियंता (यांत्रिक) २, सहाय्यक भूवैज्ञानिक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ही पदे रिक्त आहेत.

सबब उपरोक्त संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, सामान्य प्रशासन विभाग तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

## हिंगोली जिल्हा परिषदेंतर्गत गैरव्यवहाराची प्रकरणे

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक वर दिनांक २६ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधित प्रलंबित प्रकरणांबाबत जिल्हा परिषदेने काय कार्यवाही केली आहे, विभागीय चौकशी संबंधी माहिती द्यावी. अशी विचारणा समितीने केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, या सर्व प्रकरणांचा पाठपुरावा सुरु आहे. काही प्रकरणे न्याय प्रविष्ट असल्यामुळे किंवा तांत्रिक अडचणी असल्यामुळे निकाली निघालेली नाहीत.पहिल्या प्रकरणांमध्ये न्यायालयात अभियोग दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे. दुस-या प्रकरणामध्ये ३ प्रकरणांपैकी १ प्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण झाली असून २ प्रकरणाची चौकशी सुरु आहे. तिस-या प्रकरणामध्ये कौटुंबिक अडचण असल्यामुळे चौकशी करण्यामध्ये अडचण येत आहे.

यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, श्री. एस. आर. राठोड, से.नि. ग्रामसेवक, पंचायत समिती, सेनगाव यांची अपहारित वसूल पात्र रक्कम रु.१३,८२,३१३/- असून वसूल होणे बाकी आहे. तात्पुरती सेवा निवृत्ती वेतन मंजूर असल्याचे आपण दिलेले आहे. यासंबंधी कोणती कारवाई सुरु आहे? यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, श्री. एस. आर. राठोड यांचे १९९८ ते २००१, २००९ ते २०१० आणि २०११ ते २०१२ असे ३ निलंबन कालावधी आहेत. त्यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दोन निलंबन प्रकरणाची संचिका तयार आहे. तसेच वसुलीची कार्यवाही करणार आहोत.

समितीने अशी विचारणा केली की, वसुली कशी करणार आहात? यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सदरहू रक्कम मोठी आहे. वेतनातून किंवा पेन्शनमधून वसूल करण्यास वेळ लागेल. त्यामुळे सेवा निवृत्ती लाभातून किंवा इतर असलेल्या तरतुदीनुसार वसूल करावी लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या प्रकरणासंबंधी उत्तर देत असताना श्री. राठोड हे निलंबित झाले असा आपण खुलासा केला होता. तसेच वसुली झाली असल्याचे सांगितले होते आणि आता सांगत आहात की, सेवा निवृत्ती लाभातून करता येईल. एच. आर. राठोड यांच्या प्रकरणाची विभागीय चौकशी लावली होती काय? श्री. राठोड यांची निवृत्त होण्याची वाट पाहिली जात होती, असा संशय येतो.त्यांना मुद्दाम संरक्षण दिले जात आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, श्री. राठोड यांची ३ प्रकरणे आहेत. कालचे प्रकरण वेगळे होते. श्री. राठोड दिनांक ३१.०३.२०१२ रोजी सेवा निवृत्त झालेले आहेत. ३ पैकी एका प्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे व २ प्रकरणाची कार्यवाही सुरु आहे. वसूल पात्र रक्कम ज्या काही तरतुदी असेल त्यानुसार वसूल करण्यात येईल.

जिल्हा परिषद हिंगोलीच्या प्रलंबित सेवा निवृत्ती प्रकरणांबाबत दर महिन्याच्या कार्या.अधिक्षक/कक्ष अधिकारी बैठकीत विभागनिहाय आढावा घेण्यात येतो असे दिलेले आहे. प्रत्येक महिन्याला अशा बैठका होतात काय, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या मधील ज्यांचा सेवा निवृत्तीचा कालावधी २०१७ पर्यंत आहे, त्या प्रकरणांसंदर्भात महिन्याला विभागनिहाय बैठक घेण्यात येते असे स्पष्ट केले.

त्यावर समितीने असा आक्षेप घेतला की, सेवा निवृत्ती प्रकरणाबाबत प्रत्येक महिन्याला बैठक लावण्यात येते असा उल्लेख आहे. बैठका होत असतील तर निर्णय का होत नाही. बैठका कागदोपत्रीच होतात काय? त्यावर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, श्री. यु. डब्ल्यु. लांडगे यांची अपहाराची रक्कम १ लाख ७५ हजार ८१२ रुपयांचा अपहार असल्याचे आपण सांगितले. स्पष्टीकरणामध्ये ८७ हजार ९०७ रुपये वसूल होणे बाकी आहे, असे दिलेले आहे. उर्वरित रक्कम वसूल झाली आहे काय, सदरहू प्रकरण २०१२ चे आहे, अपहारित रक्कम मागील ३ वर्षात वसूल का केली नाही, आपण सांगितल्याप्रमाणे दर महिन्याला एक बैठक यानुसार मागील ३ वर्षात ३६ बैठका झाल्या असतील. या बैठकामध्ये निर्णय न घेण्याचे काय कारण आहे, श्री. लांडगे यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. आता अपहारित रक्कम त्यांच्या सेवा निवृत्तीच्या लाभातून वसूल केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी समितीने असे निदेश दिले की, मागील तीन वर्षे बैठका झाल्या परंतु निर्णय घेतला नाही. हे प्रकरण प्रलंबित ठेवल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी. आपल्या अधिका-याकडून यास विलंब करण्यात आला असेल तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. याबाबतचा अहवाल समितीला एका महिन्याच्या आत पाठवावा.

श्री. पेडगावकर यांच्या प्रकरणासंबंधी न्यायालयाने आदेश दिले आहे की, विभागीय चौकशीच्या अधिन राहून कारवाई करण्यात यावी. तरी देखील हा विषय प्रलंबित का ठेवण्यात आलेला आहे? श्री.पेडगावकर यांची विभागीय चौकशी झाली होती. त्यानंतर या प्रकरणी न्यायालयाने कोणत्या तारखेला आदेश दिला होता? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, समितीने काल यासंदर्भात सूचना केली होती की, या दोन्ही नस्ती समितीसमोर ठेवण्यात याव्यात. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक १३/०८/२०१२ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशातील दोन ओळी मी वाचून दाखवितो. माननीय उच्च न्यायालयाने अपिलात निर्देश दिले की, माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय विचारात घेऊन वित्त विषयक प्रकरणे तपासणी करुन निर्णय घ्यावा आणि ते प्रकरण निकाली काढण्यात यावे. बडतर्फीची जी कारवाई केलेली आहे त्याचा फेरनिर्णय घ्यावा आणि त्यांना रिइस्टेट करण्यात यावे. या प्रकरणाच्या रिइस्टेट संदर्भात कालच सन्माननीय सदस्यांनी सूचना दिली होती. त्यांचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अभियंता समितीकडे सुपूर्द केला. त्यावर समितीने त्यांचेवर विश्वास व्यक्त करित निदेश दिले की, ज्या व्यक्तीने हे प्रकरण हाताळले त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि कठोरातील कठोर शिक्षा करावी, तसेच दंडात्मक कारवाई करावी आणि सदरहू प्रकरणाचा अहवाल समितीकडे पाठवावा.

अपहाराच्या व गैरव्यवहाराच्या ७८ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. एकूण रक्कम ६६ लाख १ हजार ४६ रुपयांमध्ये ८ प्रकरणांची विभागीय चौकशी सुरु आहे. ३८ लाख १८ हजार ७१७ एवढी रक्कम प्रलंबित आहे आणि उर्वरित रक्कम ४४ लाख ८७२ रुपये एवढी आहे.

समितीने विचारणा केली की, ही रक्कम वसूल न होण्याचे कारण काय आहे, सदरची रक्कम वसूल करण्यासंदर्भात काय कार्यवाही सुरु आहे, जे कर्मचारी सेवानिवृत्त होतात त्यांना ना हरकत प्रमाणपत्रासाठी यावे लागते. ना हरकत प्रमाण पत्र देणारे अधिकारी कोण आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केली आहे? तत्कालीन शिक्षणाधिकारी कोण आहेत, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, महोदय, मी आजची समितीची बैठक सुरु होण्यापूर्वीच एक छोटेसे दुरूस्ती केलेले आहे. ३ कोटी ८१ लाख ऐवजी ३८ लाख १८ हजार ७१७ असे वाचण्यात यावे. प्रिंट मिस्टेक झालेली आहे. पंचायत स्तरापासून ते जिल्हा स्तरावर या सर्व प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही सुरु आहे.रिव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट घेण्यात येत आहेत. पर्टिकुलर व्यक्तींची संपत्ती, जमीन, प्लॉट, घर असेल तर ही माहिती उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. त्या संपत्तीवर बोजा चढविणे, लिलाव करणे, ही प्रोसिजर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पूर्ण करण्यात येत आहे. मागील चार महिन्यात महसूल वसुली प्रमाणपत्र आर.आर.सी.चे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविले आहेत. उरलेले सर्व प्रस्ताव एक महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवू आणि एकत्रित सर्व प्रस्तावांचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करु.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, आता पर्यंत किती रक्कम वसूल करण्यात आली आहे, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर पर्यंत अपहारित प्रकरणांची संख्या ७८ होती.यात एकूण रूपये १,५१,८६,९३५/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी रूपये २८,९०,१०७/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. यावर समितीने पृच्छा केली की, प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अपहारित रक्कम वसूल करण्यासाठी संबंधितांविरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अपहारित रक्कम वसूल करताना कर्ज उभारताना खुल्या बाजारातील जो व्याजदर असतो त्यापेक्षा एक टक्का जास्त दराने वसुली करण्यात यावी असे निदेश सर्व विभाग प्रमुखांना दिलेले आहेत.

**समितीने साक्षीच्या वेळी विभागाकडून खालील माहिती मागविली.**

७८ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून त्यात रक्कम रुपये ६६.१लक्ष गुंतलेली असून ८ प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी सुरु असून त्यात ३.८१ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे आणि उर्वरित रक्कम ४४ लक्ष ८७२ एवढी वसूल करणे बाकी आहे. प्रकरणांची संख्या पाहता न्यायप्रविष्ट प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासंदर्भात शासन निश्चित अशी भूमिका घेणार आहे काय? तसेच विभागीय चौकशीची प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे व उर्वरित थकीत रक्कम वसूल करण्याबाबत देखील प्राधान्याने वसुली कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे काय?

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जि.प. हिंगोली अंतर्गत एकूण ७८ अपहारित प्रकरणापैकी (१८ ऐवजी) ११ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. सदर ११ प्रकरणांमधील एकूण रु. ६२,७१,९१९/- अपहारित रक्कमेतुन आज रोजी रु. १०,५४,५९६/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

प्रलंबित रक्कमेच्या वसुलीसाठी ११ पैकी ९ प्रकरणांमध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी चे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. उर्वरित २ प्रकरणांमध्ये उक्त प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर न्यायालयीन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी जि.प. पॅनल वरील विविज्ञांना या कार्यालयाचे पत्र दिनांक १२/१०/२०१५ अन्वये सदर प्रकरणांमध्ये आवश्यक तो पाठपुरावा करुन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**न्यायप्रविष्ठ प्रकरणांची सद्यस्थिती**

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रकरणाची संख्या | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी संख्या | इतर व्यक्ती | अपहार प्रकरणात गुंतलेली रक्कम | अपहार प्रकरणात वसुल झालेली रक्कम माहे सप्टेंबर २०१५ अखेर | अपहार प्रकरणात प्रलंबित रक्कम | त्यापैकी निलंबित कर्मचारी संख्या | बडतर्फ कर्मचारी संख्या | त्यापैकी विभागीय चौकशी प्रस्तावीत असलेली प्रकरणे | फौजदारी गुन्हा/ न्यायप्रविष्ठ प्रकरणे | आर आर सीची कार्यवाही प्रस्तावित प्रकरणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | पंचायत | ५ | ४ | ६ | ९७५१३४ | ३५१२५६ | ६२३८७८ | १ | १ | १ | ५ | ५ | |
| २ | पशुसंवर्धन | १ | ३ | १ | ४३००० | ० | ४३००० | ० | ० | ० | १ | ० | |
| ३ | ग्रा.पा.पु | ३ | ३ | ३ | १७५०००० | ० | १७५०००० | ० | ० | ० | ३ | ३ | |
| ४ | पंस. कळमनुरी | १ | ९ | ० | २४७४४२ | ७०३३४० | १७९४१०२ | ० | ० | ० | १ | ० | |
| ५ | पं.स. सेनगाव | १ | १ | ० | १००६३४३ | ० | १००६३४३ | ० | ० | ० | १ | १ | |
| | एकूण | ११ | २० | १० | ६२७१९१९ | १०५४५९६ | ५२१७३२३ | १ | १ | १ | ११ | ९ | |

उपरोक्त संदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद हिगोंली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात आली परंतु ग्रामविकास विभागाने प्रस्तुत बाबींवर हिंगोली जिल्हा परिषदेने आणखी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता वर्तविली.

**हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.**

समितीने सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेली प्रश्नावली क्र.१ वर दिनांक २६ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहाराच्या प्रलंबित प्रकरणांबाबत जिल्हा परिषदेव्दारा या सर्व प्रकरणांचा पाठपुरावा चालू आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असुन काही प्रकरणे तांत्रिक अडचणींमुळे निकाली काढण्यास अडचणी निर्माण होत आहेत. प्रलंबित प्रकरणांपैकी एक न्यायालयात प्रलंबित असुन दुस-या तीन प्रकरणांपैकी एका प्रकरणात विभागीय चौकशी पूर्ण झाली असुन दोन प्रकरणांची चौकशी चालू आहे. तिस-या प्रकरणात कौंटुबिक अडचणीमुळे चौकशीत अडचण येत आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले, त्याचप्रमाणे श्री. एस. आर.राठोड से. नि.ग्रामसेवक यांचेकडून एकूण अपहारित रक्कम १३,८२,३१३/- लक्ष वसूल होणे बाकी आहे. त्यांचे तात्पुरते सेवा निवृत्ती वेतन सुरु करण्यात आले आहे. त्यांचा १९९८ ते २००१, २००९-१०, २०११-१२ असा निलंबन कालावधी आहे. त्यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन निलंबन प्रकरणांची संचिका तयार आहे, परंतु अद्याप वसुलीची कारवाई सुरु केली नाही. त्याच प्रमाणे श्री. लांडगे यांची अपहारित रक्कम रु.१.७५ लाख असुन त्यापैकी ८७०००/-रुपये वसुल होणे बाकी आहे. श्री. लांडगे यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली असुन त्यांची अपहारित रक्कम त्यांच्या सेवानिवृती लाभातुन वसूल केली आहे.

जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत एकूण ७८ अपहारित प्रकरणापैकी (१८ ऐवजी) ११ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सदर ११ प्रकरणांमधील एकूण रु.६२,७१,९१९/- अपहारित रक्कमेतून आज रोजी रु. १०,५४,५९६/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.प्रलंबित रक्कमेच्या वसूलीसाठी ११ पैकी ९ प्रकरणांमध्ये मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी चे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. उर्वरित २ प्रकरणांमध्ये उक्त प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर न्यायालयीन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद पॅनल वरील विधिज्ञांना या कार्यालयाचे पत्र दिनांक १२/१०/२०१५ अन्वये सदर प्रकरणांमध्ये आवश्यक तो पाठपुरावा करुन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त विशद केलेली माहिती लक्षात घेता संबंधित अपहारित तसेच गैरव्यवहाराच्या प्रकरणामध्ये सर्व संबंधित अपचारी कर्मचारी/अधिका-यांकडून वसुली करण्यास जिल्हा परिषद प्रशासन तोकडे पडलेले आहे असे समितीला वाटते. जिल्हा परिषदेने जाणीवपूर्वक या प्रकरणी दुर्लक्ष केले असुन वसुलीची कारवाई प्रलंबित ठेवून गैरव्यवहार करणा-या अधिका-यांना एक प्रकारचे अभय देऊन त्यांना पाठीशी घातले असल्याचे समितीस दिसून येते. ७८ पैकी ११ प्रकरणे न्यायप्रविष्ट असुन त्यात ६६.१ लक्ष रक्कम गुंतलेली आहे. सदरची रक्कम वसुल करण्यास किंवा न्यायालयीन प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात जिल्हा परिषदेने कुठलीही ठोस कार्यवाही केली नाही. समितीने सांगितल्यानंतर पॅनल वकीलांना पत्राव्दारे कळविले आहे, परंतु स्वयंप्रेरणेने जिल्हा परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्याच प्रमाणे ८ प्रकरणांमध्ये ३.८१ कोटी गुंतलेले असून त्यापैकी केवळ ४४,००८७२/- एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशी प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. मोठया प्रमाणावर रक्कम गुंतलेली असूनही विभागीय चौकशी प्रलंबित असणे सुप्रशासनाच्या दृष्टीने धोकादायक आहे. यामध्ये जिल्हा परिषदेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले असुन जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांनी अपचारित कर्मचा-यांना एक प्रकारे पाठीशी घातल्याचे दिसते. या सर्व प्रकरणांची त्वरेने चौकशी करुन अपचा-यांना शासन नियमाप्रमाणे दंडित करणे अपेक्षित होते, परंतु तसे घडले नसल्यामुळे समीती तीव्र खेद व्यक्त करते. अधिका-यांच्या कार्यतत्परतेवर शंका उपस्थित करुन जे अधिकारी या अपहाराच्या प्रकरणी वसुलीस विलंब लावत आहेत त्यांची प्रकरण निहाय चौकशी करुन खुलासा मागविण्यात यावा व खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधित सादरकर्त्या अधिका-यावर कारवाई करावी अशी शिफारस समिती करीत आहे.

न्याय प्रविष्ट प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात मोहिम हाती घ्यावी मग ते लोक अदालत असो किंवा सामोपचाराने निकाली काढणे असो कारण जिल्हा परिषदेव्दारे वकिलांची फी देखील संशोधनाचा विषय असल्यामुळे या प्रकरणी देखील जिल्हा परिषदेने अपहारित रक्कमेपेक्षा वकिलांची फी जास्त देण्यात आली आहे किंवा कसे याची प्रकरण निहाय माहिती तपासण्यात यावी त्यानुसार अपहारित रक्कमेपेक्षा वकीलांची फी हा खर्च जास्त येत असल्यास सदर अपहारीत प्रकरणे न्यायालयातुन मागे घेण्याबाबत तसेच ते वगळण्याबाबत कारवाई करावी. अशा वगळलेल्या प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचा-यां विरुध्द कठोर अशी प्रशासकीय कारवाई करावी जेणे करुन शासनाची अपहारीत रक्कम वसूल होईल. अशीही समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे प्रलंबीत वसुली त्वरीत करावी व केलेल्या वसुलीचा भरणा शासकीय कोषागारात करावा अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती ३ महिन्याच्या आत समितीस देण्यात यावी.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा पंचायती राज समितीच्या निर्देशाप्रमाणे जिल्हा परिषद, हिंगोलीकडील प्रलंबीत ७८ अपहार प्रकरणां मध्ये रु.१५१४११२३/- रक्कम गुंतलेली होती. यापैकी ४८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. वरील अपहारीत रक्कमेपैकी निकाली प्रकरणांमध्ये वसुल केलेली रक्कम रु. ८५२७१६१/- एवढी आहे.

शिल्लक प्रलंबीत ३० अपहार प्रकरणांमध्ये वसुलपात्र रक्कम रु. ६६१३९६२/- असुन या ३० प्रकरणांपैकी ११ प्रकरणे ही न्यायप्रविष्ट स्वरुपाची आहेत.

न्यायप्रविष्ठ प्रकरणात एकुण रु. ७२२२६४३/- रक्कम गुंतलेली होती त्यापैकी रु.१७८३६००/- वसुल केलेली आहे. व एकुण रु. ५४३९०४३/- रक्कम वसुल करावयाची आहे. न्यायालयीन निवाड्याप्रमाणे अपहाराची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

विभागीय चौकशी प्रकरणामध्ये कृषी विभागाच्या १ प्रकरणात विभागीय चौकशी पुर्ण करण्यात येवून संबंधित कर्मचा-यास जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

अन्य उर्वरीत १९ प्रकरणात रु. ११७४९१९/- रक्कम अपहाराची आहे. वरील प्रमाणे अपहाराची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी १६ प्रकरणांमध्ये आर.आर.सी. ची कार्यवाही करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

अपहार प्रकरणात फौजदारी स्वरुपाची कार्यवाही केलेली असल्यामूळे जिल्हा परिषदेच्या वतीने स्वतंत्र वकीलाची नेमणुक न करता फौजदारी स्वरुपातील प्रकरणात सरकारी वकीलांमार्फत मा.न्यायालयामध्ये बाजू मांडण्यात येत असल्यामुळे जिल्हा परिषद कडून वेगळी फी वकीलांना प्रदान केलेली  नाही.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे ?**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, यामध्ये अपहाराची रक्कम असून मा.न्यायालयात बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. न्यायालयात गेलेल्या प्रकरणांतील रक्कम वसूल कशी करावी हा एक प्रश्न आहे. मा.न्यायालयाने स्थिगिती दिलेली नसेल तर ती वसूली करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेने करावी.

यावर सचिवांनी खुलासा केला की, एकूण ७८ प्रकरणे होती. ५४ प्रकरणात वसुली झाली आहे, २४ प्रकरणात वसुली झालेली नाही. २४ प्रकरणांपैकी ११ प्रकरणामध्ये एफआयआर दाखल केलेला आहे. ९ प्रकरणाची वसुली त्यांच्या मालमत्तेमधून करण्यासाठी महसूल वसुली प्रमाणपत्र (रेव्हेन्यू रिकवरी सर्टीफिकेटस) तयार करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. चार प्रकरणातील एक व्यक्ती मयत आहे, दुसरी व्यक्ती सेवानिवृत्त असून त्यांच्या सेवानिवृती वेतनातून वसुलीची कार्यवाही सुरु आहे. एका प्रकरणात ३३ हजार रुपये आहे त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. एका प्रकरणात सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. सेवा निवृत्ती वेतनातून निधी वसूल करण्यात येणार आहे. सर्व प्रकरणांमध्ये वसुलीची प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, याबाबत १३ अधिका-यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून ३ लाख रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आली आहे काय.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, यामध्ये वसुलीची कारवाई झाली असून सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक १ वर हिंगोली परिषदेतंर्गत गैरव्यवहारासंबंधित प्रलंबित प्रकरणांबाबत जिल्हा परिषदेकडून पाठपुरावा सुरू असून काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.  समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद हिंगोली कडील प्रलंबित ७८ अपहार प्रकरणामधील रुपये १,५१,४१,१२३/- एवढी रक्कम गुंतलेली होती, त्यापैकी ४८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. वरील अपहारित रकमेपैकी निकाली प्रकरणांमध्ये वसुल केलेली रक्कम रुपये ८५,२७,१६१/-एवढी आहे. उर्वरित ३० अपहार प्रकरणांमध्ये ११ प्रकरणे न्यायप्रविष्ट असून वसुलपात्र रक्कम रुपये ६६,१३,९६२/- एवढी आहे. सदर रक्कम वसुल करण्यात यावी.

**उर्वरीत १९ प्रकरणातील रुपये ११,७४,९१९/- एवढी अपहाराची रक्कम वसुल करण्यात यावी या करीता १६ प्रकरणांमध्ये महसूल वसुली प्रमाणपत्राची आरआरसी कार्यवाही जिल्हाधिका-यामार्फत करण्यात यावी. न्यायप्रविष्ट प्रकरणात एकुण रुपये ७२,२२,६४३/- रक्कम गुंतलेली होती, त्यापैकी रुपये १७,८३,६००/-वसुल करण्यात आलेले असून उर्वरित रक्कम रुपये ५४,३९,०४३/- न्यायालयीन निर्णयास अधीन राहून अपहाराची रक्कम वसुल करण्यात यावी. एकूण ७८ अपहार प्रकरणांपैकी ५४ प्रकरणात वसुली झालेली असून २४ प्रकरणात वसुली झालेली नाही. ९ प्रकरणाची वसुली मालमत्तेवर बोजा चढवून करण्यासाठी जिल्हाधिका-यामार्फत महसूल वसुली प्रमाणपत्र (आरआरसी) तयार करण्यात यावे व अपहारित रकमेची संबंधित व्यक्तीकडून वसुली करण्यात यावी. १३ अधिका-यांविरूध्द कारवाई करण्यात येऊन तीन लाखांचा दंड वसुल केलेला आहे. त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी, तसेच उपरोक्त प्रकरणी वसुलपात्र अपहारित रक्कम वसुल करण्यासाठी केलेल्या कार्यवाही अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत समितीस पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### मौजे चांबळी ता. पुरंदर येथील दलित वस्ती सुधार योजनेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट,२०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक ११ ऑगस्ट,२०१५ रोजी पुणे जिल्हयातील पुरंदर पंचायती समितीला भेट दिली असता तेथील मौजे चांबळी गावामध्ये केलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत गटाराचे १० लाख रुपयाचे काम केल्याचे आढळून आले त्यावर समितीने विचारणा केली की, यादव वस्तीमध्ये कॉंक्रीटीकरणाचे काम केव्हापासून सुरु आहे, यावर गटविकास अधिकारी यांनी सदरहू काम २०१४-१५ मध्ये सुरु केले असल्याचे समितीस विदित केले. समितीने आणखी विचारणा केली की, सदरहू कामाचे रेग्युलर पध्दतीने कॉंक्रीटीकरण केले काय, तसेच ते काम किती रकमेचे होते, त्यावर गट विकास अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देवून सदरहू कामाचे रेग्युलर पध्दतीने कॉंक्रीटीकरण केले असून, हे काम ५ लाख रुपयांचे होते असे समितीस विदित केले. समितीने पुढे विचारणा केली की, चांबळी गावामध्ये दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गटाराचे १० लाख रुपयांचे काम केलेले आहे काय, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.समितीच्या मते चांबळी या गावात केवळ १०-२० टक्के काम दलित वस्तीमध्ये झाले असून, उर्वरित काम बिगर दलित वस्तीमध्ये झालेले आहे, त्यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, चांबळी गावात दलित वस्तीमध्ये घरे अंतरा-अंतरावर आहेत.त्यामुळे बिगर दलित वस्तीमध्ये कामे झाल्याचे वाटत असावे. परंतु चांबळी गावात दलित वस्ती सुधार योजनेची कामे ही दलित वस्ती मध्येच झालेली आहेत. यावर समितीचे समाधान झाले नाही समितीच्या मते वास्तविक पाहता मागास समाजासाठी विशिष्ट रकमेची तरतूद करुन त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात. परंतु चांबळी गावा मध्ये दलित वस्तीच्या नावाखाली बिगर दलित वस्तीमध्ये काम झाल्याचे दिसून येते. समितीने निदेश दिले की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सदरहू कामाची चौकशी करावी व समितीस अहवाल सादर करावा. यावर अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कामाची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

पंचायत समिती पुरंदरअंतर्गत मौजे चांबळी गावामध्ये केलेल्या दलित वस्ती सुधारणे अंतर्गत केलेल्या गटाराच्या कामाची चौकशी करण्याचे समितीने निदेश दिले आहेत त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर काय कार्यवाही केली?

**समितीस जिल्हापरिषदे कडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती पुरंदर अंतर्गत मौजे चांबळी येथील बंदीस्त गटार कामाची चौकशी करण्याचे समितीने निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे सदर कामाची चौकशी करणेत आलेली आहे. त्याची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

मौजे चांबळी ता. पुरंदर येथील दलित वस्ती भूमिगत गटार बांधणे या कामासाठी दलित वस्तीमध्ये गटार बांधणे साठी रक्कम रु.७,७०,०००/- मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेकडील आदेश क्र. समाजकल्याण विभाग जा.क्र.जिप/सभा/प्रमा/२०१४/९८९ पुणे दि.४-९-२०१५ अन्वये मंजूरी दिलेली आहे तसेच ग्राम पंचायत चांबळी यांनी ग्रामसभा ठराव क्र.१०दि.२५/११/२०१४अन्वये पिंपळी खालील बंदिस्त गटाराचे कामास ग्रामपंचायत निधी म्हणून रक्कमरु.२,०१,०४५/-मंजुरी दिलेली आहे. सदर दोन्ही कामाचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रु.९,७१,०४५/-चे तयार करणेत आलेले होते व त्या एकत्रित अंदाजपत्रक रु.९,७१,०४५/-यास मा. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि.प.पुणे यांचेकडील पत्र क्र.१३/२०१४ दि.१४/१/२०१५ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

मुल्यांकन दाखला देताना मुल्यांकन क्रमांक १ अन्वये दलितवस्तीसाठी रक्कम रु.७,७१,७५६/- चे मुल्यांकन देण्यात आलेले आहे व मुल्यांकन क्र.२ अन्वये इतर कामाचे मुल्यांकन रु..१,९८,३०९/-चे देण्यात आलेले आहे. त्यामुळे दलित वस्तीमध्येच गटार बांधणे या कामासाठी मंजूर रक्कम वापरणेत आलेली आहे. तसेच पिंपळाखाली जागा ते कटकेमस यामधील बंदिस्त गटारा चे कामासाठी ग्रामपंचायत निधी वापरणेत आलेला आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवापर किंवा अपहार झालेला नाही.

प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेपैकी रु.१,३२,६४३/-इतक्या रक्कमेचे काम दलित वस्तीलगत अन्य वस्तीमध्ये झालेले आहे. या गटर्सचा वापर दोन दलित कुटुंबाना सुध्दा होत आहे. भविष्यात अन्य दलित कुटुंबांना सुध्दा त्याचा उपयोग होऊ शकतो. स्थानिक पातळीवर या योजनेअंतर्गत कामे करताना काही प्रमाणात अन्य वस्तीमधील लोकांना त्याचा लाभ होत असतो ही बाब विचारात घ्यावी हि विनंती.

**पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.**

पंचायती राज समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावर पंचायत समिती, पुरंदर येथे भेट देवून गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने पुरंदर पंचायत समिती क्षेत्रात दलित वस्ती सुधारणेची कामासंदर्भात विचारणा केली असता समितीस मौजे चांबळी ता. पूरंदर येथील दलित वस्तीचे केवळ १०-२० टक्के काम दलित वस्तीमध्ये व उर्वरित काम बिगर दलित वस्तीमध्ये करण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दलित वस्तीत घरे अंतरा-अंतरावर असल्यामुळे सरदहू काम बिगर दलित वस्तीमध्ये झाल्याचे वाटत आहे. समाज कल्याणच्या २०टक्के निधीतून काम समाज वस्तीतच होणे आवश्यक आहे. मागास समाजवस्ती त्याकरिता विशिष्ट तरतुद करुन त्यांचे करिता कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. परंतु चांबळी गावात दलित वस्तीच्या नावाखाली बिगर दलित वस्तीमध्ये काम झाले असेल तर ते उचित नाही याकरिता समितीने सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने चौकशी करुन आपला अहवाल समितीकडे पाठविला. सदरहू अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणातील बंदीस्त गटाराचे कामावर ९,७१,०४५/- रुपयांची तांत्रिक मान्यता देण्यात आली. यावेळी एकूण १,३२,६४३/- इतक्या रकमेचे काम दलित वस्तीच्या लगत अन्य वसतीमध्ये झाले असून याचा फायदा दोन दलित कुटुंबाना सुध्दा होत असून भविष्यात आणखी दलित कुटुंबाना होवू शकेल. स्थानिक पातळीवर काम करताना योजनांचा लाभ अन्य लोकांना होऊ शकतो ही बाब विचारात घेण्याबाबतची विनंती शासनाने केली.

समितीच्या मते समाजकल्याण अंतर्गत दलित वस्ती सुधारणांची कामे बंदीस्त गटार इत्यादी कामे करताना गावातील लागून बिगर दलित वस्ती असल्यास समितीचे उत्तर लक्षात घेवून बंदीस्त गटाराचे शेवटचे तोंड तसेच सोडून देता येत नाही. ते बिगर दलित वस्तीमधून पुढे गावाबाहेर नेण्यात आले आणि सदरची बाब विचारात घेण्यात यावी अशी विनंती जिल्हा परिषदेने समितीला केली. जेव्हा दलित वस्तींच्या सुधारणा किंवा मागासवर्गीयांचे जिवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते तेव्हा ते त्यास कामासाठी वापरले पाहिजे असे समितीला प्रकर्षाने वाटते. बिगर दलित लोकाचे जिवनमान अगोदरच उंचावले असल्याने त्यासाठी सर्वसाधारण निधीत तरतुद केली जाते.परंतु वंचित घटकाचे जीवनमान उंचावणे आवश्यक असल्याने ज्या कारणासाठी निधीत तरतुद केली त्याच कारणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. काम राबविण्या-या या बाबीची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळेला दलित वस्तींचे अनुदान इतर बाबींसाठी देखील खर्च केले जाते त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने याबाबीकडे विशेष सतर्क असणे आवश्यक आहे. प्रस्तुत काम हे दलित वस्तीमध्ये केलेले आहे व त्याचा लाभ काही बिगर दलित व्यक्तींना झाल्याचे जिल्हा परिषदेने मान्य केले आहे. आता लोकांचे राहणीमान त्याचप्रमाणे वस्त्यांमध्ये देखील बदल होत आहे. बिगर दलित वस्तीत दलित आणि दलित वस्तीत बिगर दलित लोक वसाहत करुन रहात आहेत हे देखील सदृढ समाजिक ऐक्यासाठी आवश्यकच आहे. अशी समितीची भूमिका असल्यामुळे जिल्हा परिषदेची विनंती मान्य करण्यात येत असताना दलित वस्तीतील मंजूर कामे ही त्या वस्तीसाठीच झाली पाहिजेत असा समितीचा आग्रह आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा.पंचायती राज समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने दलित वस्तीतील मंजूर कामे दलित वस्तीसाठीच करणेची दक्षता घेणेत येत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :-**

जिल्हा परिषद, पुणे यांच्या कार्यवाहीस /अभिप्रायास संबंधित विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की,सदर विषयाच्या बाबतीत देखील कार्यवाही झाली आहे. आपण दक्षता घेण्यात येत असल्याचे सांगितले आहे. परंतु शासन निर्णयान्वये किंवा परिपत्रकान्वये कडक सूचना करावयाच्या वाटल्या तर त्या केल्या तर बरे होईल, असे वाटते. कारण काही ठिकाणच्या दलित वस्तीत कामे केली जात नाहीत. गावातीलच दलितवस्तीचा निधी दलित वस्तीच्या बाहेरच्या कामांना वापरला जातो असा मुद्दा समितीने मांडला असता, त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जनरली तसे होत नाही असे उत्तर त्यांनी समितीला दिले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, दलित वस्तीतच खर्च करणे बंधनकारक आहे. आपण तपासणी करीत आहोत, ती आपल्याकडील दलित वस्तीतील सर्व कामे दलित वस्तीतच झालेली आहेत का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की ,हा मुद्दा ज्या कामावरुन उपस्थित झाला, त्या संदर्भात मी काही माहिती देऊ इच्छितो की, ते रस्त्याचे काम होते, तो रस्ता काही दलित वस्ती नसलेल्या भागातूनही गेला आहे, त्यामुळे समितीला कदाचित तसे वाटले असेल. ते रस्त्याचे काम होते. रस्ता असल्यामुळे आपण त्याला असे रेस्ट्रिक्शन करु शकत नाही. आम्ही सर्व खात्री करुन घेतली आहे की, रेकॉर्डवर असे आहे की, दुसरीकडे कुठेही असा प्रकार झालेला नाही. जेथे मिश्र वस्ती असते, तेथे समितीने देखील काम करण्यास परवानगी दिली आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दलित वस्तीच्या संदर्भातील कोणत्याही कामाचे पैसे दलित वस्तीतच युटिलाईज केले पाहिजेत. दलित वस्तीतील कामांचा पैसा दलित वस्ती मध्येच यापुढे खर्च झाला पाहिजे. दक्षता घेण्यात येत आहे, असे सांगितले आहे. तेथे तसेच झाले पाहिजे, दक्षता घेत आहे, असे तुम्ही म्हणू शकत नाही, कारण ते तुम्हाला बंधनकारकच आहे, दलित वस्तीचा पैसा दलित वस्तीतील कामांवरच खर्च झाला पाहिजे. मोघम उत्तर देऊन चालणार नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दलित वस्तीतील काम दलित वस्तीतच झाले पाहिजे. हा मुद्दा ज्या कामावरुन उपस्थित झाला, ते रस्त्याचे काम होते. रस्ता असल्यामुळे काही बाबतीत थोडी सवर्ण वस्ती त्यामध्ये आली आहे. बाकी शंभर टक्के मान्य आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, दलित वस्तीचे काम मंजूर करण्यासाठी प्रयत्न केले जातात. निकष असा आहेकी, तेथे बहुसंख्य दलित लोक राहत असले पाहिजेत. आपण दलित वस्तीचे एक किंवा दोन घरे असतील किंवा दलित लोकांची संख्या कमी असेल तरी इतर लोकांसाठी कामे मंजूर करता, असेन होता, तेथे बहुसंख्य दलित लोकांची वस्ती असली पाहिजे. आपण काम करताना हा निकष पाळला पाहिजे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अशी सूचना केली की,दलित वस्तीचे दलित वस्तीतच काम करावे, या योजनेचा गैरवापर होऊ नये. दलित लोकांचे एक जरी घर असले तरी त्या नावाखाली काम मंजूर होते आणि त्याचा फायदा इतरांना होतो. त्यामुळे असेही होता कामा नये. एक घर व एक वस्ती यामध्ये फरक आहे. ब-याच वेळा असे होते की, दलित वस्तीपर्यंत जाणारा रस्ता गावातून जात असतो किंवा लगत जात असतो. त्यामुळे आपण आक्षेप घेऊ नये, अशी माझी विनंती आहे. शेवटी तो रस्ता त्यांना दिलेला आहे, तो त्यांच्यासाठी असलाच पाहिजे. पण तो रस्ता सवर्णाच्या वस्तीतून जात असेल तर त्याला विरोध करण्याचे कारण असू नये. फक्त तो निधी दलित वस्तीसाठीच खर्च केला जावा.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हापरिषद पुणे अंतर्गत मौजे चांबळी ता.पुरंदर येथील दलित वस्ती सुधारणा योजनेबाबत सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत घेण्यात आलेल्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, मौजे चांबळी गावामध्ये केलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत गटाराचे

दहा लाख रुपयांचे काम करण्यात आले होते. सदर काम केवळ १०-२० टक्के दलित वस्तीमध्ये झाले असून उर्वरित काम बिगर दलित वस्ती मध्ये झालेले आहे. सदर दलित वस्तीमध्ये भूमिगत गटार बांधण्यासाठी समाजकल्याण विभागाने रुपये ७,७०,०००/- एवढी रक्कम अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने दिनांक ०४-०९-२०१५ अन्वये मंजूर केलेली आहे. तसेच ग्रामसभा ठरावान्वये पिंपळीखातिर बंदिस्त गटाराचे कामास ग्रामपंचायत निधी म्हणून रुपये २,०१,०४५/- एवढया रकमेस मंजूरी दिलेली आहे. दोन्ही कामाचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रुपये ९,७१,०४५/- तयार करण्यात आलेले होते, त्यास कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी दिनांक १४ जानेवारी,२०१५ अन्वये तांत्रिक मान्यता दिली आहे.

समाज कल्याणच्या २० टक्के निधीतून दलित वस्तीतील कामे दलित वस्तीतच होणे आवश्यक आहे. याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याची शिफारस समितीने केली होती. या संदर्भात जिल्हापरिषद हिंगोली यांनी दलित वस्तीतील कामे दलित वस्तीसाठीच करणेची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागाने जिल्हा पारिषद, पुणे यांच्या अभिप्रायाशी सहमत असल्याचे असे लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे. लेखी माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, रस्त्याचे काम होते तो रस्ता काही दलित वस्ती नसलेल्या भागातूनही गेलेला आहे.  दुसरीकडे कोणत्याही ठिकाणी असा प्रकार झालेला नाही. जेथे मिश्र वस्ती असते तेथे समितीने देखील काम करण्यात परवानगी दिली आहे. रस्त्याचे काम असल्यामुळे काही बाबतीत थोडी सवर्ण वस्ती त्यामध्ये आली आहे, या प्रकरणी समितीने असे मत व्यक्त केले की, दलित वस्तीमध्ये इतर समाजाची घरे असू शकतात, तथापि **जास्तीत जास्त कामे दलित वस्तीमध्ये त्या भागात होण्यासाठी प्रयत्न करावेत याकरिता बहुसंख्य दलित लोक पाहिजे दलित लोकांचे एक जरी घर असले नाही त्या नावाखाली कामे मंजूर करून इतरांना या योजनांचा फायदा करून देण्यामुळे या योजनेचा हेतू सफल होऊ शकत नाही. या दृष्टीने दलित वस्तीतील सुधार योजना राबविताना निकषाप्रमाणे मंजूरी देण्यात यावी या योजनांचा दुरूपयोग केल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरूध्द प्रशासकीय स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी समितीस शिफारस आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हयातील बारामती पंचायती समितीला भेट देवून गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, ढाकाळे गावातील योजनेच्या बाबतीत गंभीर बाबी निदर्शनास आणून देऊन सुध्दा त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. या कामाच्या बाबतीत वेगवेगळ्या माध्यमातून आदेश दिले गेले. या संपूर्ण कामामध्ये गैरप्रकार आणि अनियमितता झाली आहे. तसेच या कामाच्या संदर्भात कारवाई करण्याच्या बाबतीत अक्षम्य दिरंगाई करण्यात आली. मुळात ही पिण्याच्या पाण्याची योजना होती. तरी सुध्दा ढाकाळे गावातील पाणी पुरवठा योजना तेथील लोकांपर्यंत पोहचली नाही. या कामाच्या बाबतीत माननीय न्यायालयाचे आदेश असताना, या कामामध्ये अनियमितता झालेली असताना, या कामातील गैरप्रकार निदर्शनास आणून दिलेला असताना सुध्दा प्रशासनाच्या वतीने संबंधितांवर कारवाई केली जात नसेल तर वाईट प्रवृत्तीला पाठीशी घालण्यात येत आहे असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे या प्रकरणी फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी. तसेच संबंधितांकडून आर्थिक वसुलीची कारवाई केली पाहिजे. या कामाच्या बाबतीत कमीत कमी ५२ वेळा पत्रव्यवहार केला होता. परंतु तरी सुध्दा त्या अनुषंगाने उचित कार्यवाही झाली नाही. तत्कालीन पाणीपुरवठा मंत्री, माननीय उच्च न्यायालय यांनी आदेश दिलेले असताना सुद्धा त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नाही. ज्या दिवशी संबंधित कार्यकारी अभियंता निवृत्त झाले त्या दिवशी त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. या गैरव्यवहाराला जबाबदार असणा-यांनी एमबी रेकॉर्ड सुद्धा बनावट केले आहे. यावर उपअभियंता यांनी ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी समितीस विदीत केले की, या संपूर्ण प्रकरणाला २००७-०८ या वर्षातील अधिकारी जबाबदार आहेत. डाकाळे गावातील पाणी पुरवठा योजनेमध्ये अनियमितता झाल्याबाबत श्री. शिंदे नावाच्या व्यक्तीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यांनी निदर्शनास आणून दिले होते की, सदरहू योजनेची पाईप लाईन कमी ऊंची वरुन टाकली आहे, तसेच इतरही बाबी निदर्शनास आणून दिल्या होत्या. सदरहू प्रकरणाचा निकाल फेब्रुवारी-२०१५ मध्ये लागला. न्यायालयाने सदरहू योजनेचे काम सुरु करण्याबाबत निर्णय दिला होता. त्यानुसार सदरहू योजनेचे काम सुरु केले आहे. आजच्या घडीला ७० ते ८० टक्के काम पूर्ण केले आहेत. उर्वरित काम ऑक्टोबर-२०१५ पर्यंत पूर्ण करणार आहोत.

समितीने आणखी विचारणा केली की, निविदा प्रक्रिये नुसार विहित मुदतीत काम पूर्ण होणे अपेक्षित असताना सुध्दा ते काम मुदतीत पूर्ण केले नाही. त्यामुळे एक प्रकारे त्या गावातील लोकांच्या तोंडचे पाणी पळविले गेले. या कामाची वर्क ऑडर कधी दिली, यावर उप अभियंता ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी वर्क ऑर्डर २००८ ला दिली आणि २००९ मध्ये काम पूर्ण करणे अपेक्षित होते. वर्क ऑर्डरनुसार एक वर्षात काम पूर्ण करावयाचे होते. परंतु सदरहू प्रकरण दीड वर्षे उच्च न्यायालयात सुरू होते, असे उपअभियंता (पा.पु.) यांनी समितीस विदीत केले.

समितीने आणखी विचारणा केली की, अशा प्रकारे कामामध्ये अनियमितता करणा-या प्रवृत्तींना आळा घातला पाहिजे. अशा अधिका-यांच्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला गेला आहे. माननीय मंत्री आणि माननीय न्यायालयाचे आदेश असताना सुध्दा त्या आदेशांना केराची टोपली दाखविली गेली. शिवाय या कामाचे जे एमबी रेकॉर्ड बनविण्यात आले ते चुकीचे आहे. या अनियमिततेमध्ये संपूर्ण यंत्रणा सहभागी आहे. या कामाच्या फाईलवर ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या सह्या असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांच्या कडून वसुली केली पाहिजे. हे संपूर्ण काम किती रकमेचे होते, यावर उप अभियंता ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी समितीस विदीत केले की, हे काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे होते. या कामावर २००७-०८ मध्ये १७ लाख ७८ हजार रुपये खर्च झालेला आहे. त्यानंतर हे काम बंद झाले. सदरहू उत्तरावर समितीचे समाधान झाले नाही. समितीने असे निदेश दिले की, या संपूर्ण कामाची चौकशी करण्यात यावी. या योजनेमध्ये अनियमितता झाल्यामुळे गावातील लोकांना ७ वर्षे पिण्याचेपाणी मिळू शकले नाही. पाणी व्यवस्थापन समितीमध्ये या योजनेतील कामाच्याबाबतीत मतभेद निर्माण झाले. या सर्व प्रकरणाला समितीतील सदस्य जबाबदार असतील तर त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर सुध्दा कारवाई करावी. तसेच या प्रकरणी जे जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करुन एक ते दीड महिन्यात समितीला अहवाल सादर करावा.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

मौजे डकाळे, ता. बारामती गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे असून सदर कामावर १७ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होवूनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सदरहू कामात अनियमितता झालेली आहे. त्यावर समितीने संपूर्ण योजनेच्या कामाची चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर निलंबनाची कारवाई करुन दिड महिन्यात समितीला अहवाल पाठवावा असे निदेश दिले आहेत, त्यानुसार चौकशी पूर्ण झाली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली आहे?

**चौकशी अहवाल**

मा. उप आयुक्त (विकास), पुणे यांनी यापूर्वीच दिनांक ३०-०५-२००९ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला असुन त्यामध्ये खालील बाबी दिसुन आलेल्या आहेत-

१. मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेची समिती गठित करण्यासाठी घेण्यात आलेल्या दिनांक १-०५-२००७ रोजीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी दुबार स्वाक्ष-या केल्याचे निदर्शनास आले आहे.

२. मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेसाठी गठित केलेल्या समित्या या शासनाच्या सुचनेप्रमाणे झालेल्या नाहीत.

३. सदर नळ पाणी पुरवठा योजनेची पाईप टाकणेची खोदाई खडक कडक असल्याने व भौगोलिक परिस्थितीनुसार योग्य असेल ते करुन घेणे गरजेचे आहे.

**समितीस उपरोक्त मुद्दयांची जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे ढाकळे, ता. बारामती या योजनेचे चौकशी अहवाल मा.उप आयुक्त (विकास), पुणे यांनी यापूर्वीच दिनांक ३०-०५-२००९ व मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २८-०७-२०१० सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असलेने मा. जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष्यांना सरपंच पदावरुन पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित उप अभियंता श्री. पवार व शाखा अभियंता, श्री. भांडवलकर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणेसाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना दयावयाचे पत्राचे प्रारुप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक २९-१०-२०१५ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केलेले आहे. तसेच शाखा अभियंता, श्री.बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ नुसार निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव बांधकाम विभाग (उत्तर) यांचेमार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

**केलेली कार्यवाही**

सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असलेने मा. जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरुन पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. व्ही. एम. तंवर (सेवानिवृत्त) यांचा शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाने पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-६/५९०/१५, दिनांक ३०-०६-२०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे. तसेच तत्कालीन उप अभियंता, श्री.मनिष पवार व तत्कालीन शाखा अभियंता, श्री. भांडवलकर (सेवानिवृत्त) हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार निलंबनाची कारवाइ करणेसाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई यांना या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ग्रापापु/आस्था/५१६/१५, दिनांक ०३-११-२०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच शाखा अभियंता, श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

**समितीस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे ढाकळे, ता. बारामती या योजनेचे चौकशी अहवाल उप आयुक्त (विकास), पुणे यांनी यापूर्वीच दिनांक ३०-०५-२००९ व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अनुषंगाने, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २८-०७-२०१० सादर केलेले आहे. त्या अनुषगाने सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असलेने जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरून पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. व्ही. एम. तंवर (सेवानिवृत्त) यांचा शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाने पत्र जा.क्र.साप्रतिवि/आस्था-६/५९०/१५, दि. ३०-०६-२०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे. तसेच तत्कालीन उप अभियंता, श्री. मनिष पवार व तत्कालीन शाखा अभियंता, श्री. भांडवलकर (सेवानिवृत्त) हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणेसाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजी प्रा., मुंबई यांना जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ग्रापापु/आस्था/५१६/१५, दिनांक ०३-११-२०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापि, जनहित याचिका क्र. १६७/२०१२, दि. १०-०२-२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने मौ. ढाकाळे येथील पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणीस विलंबास जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुध्द फौजदारी खटला (Prosecution) दाखल करण्याबाबतची शक्यता अजमाविण्याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेला दिलेले आहेत. त्यानुषंगाने सदर प्रकरणी श्री. व्ही. एम. तंवर, कार्य. अभियंता (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द खटला दाखल करण्यात आला आहे का, तसेच सदर प्रकरणी आणखी काही अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्यास त्यांचेविरुध्द देखील फौजदारी कार्यवाही करण्यात आली का, या बाबतची माहिती विभागाच्या दि. ०५-११-२०१५ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून मागविली आहे.

तसेच शाखा अभियंता, श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

या योजनेतील उर्वरित काम प्रगतीत असून यापैकी ९०% कामे पूर्ण करुन दि. ०२-१०-२०१५ पासून गावास नवीन पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

**पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.**

मौजे ढाकाळे, ता. बारामती, जि. पुणे या गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम ६४ लाख ६६ हजार असून सदर कामावर १७ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होऊनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी कामात अनियमितता व गैरप्रकार झालेला आहे. ही पाणी पुरवठ्याची योजना असून लोकांपर्यंत सदर योजना पोहचलेली नाही व त्याची फलनिष्पती झालेली नाही. या योजनेत गैरप्रकार निदर्शनास आणुनही आपण प्रकर्षाने संबंधितांवर काहीही कारवाई केलेली नसल्यामुळे समितीने याप्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी व कर्मचारी या प्रकरणी जबाबदार असतील त्यांचेवर नियमानुसार कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

उक्त निदेशानुसार सदर योजनेच्या बाबतीत ग्रामीण पाणी पुरवठा चौकशी अहवाल निदर्शनास आले असल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना काढून टाकले असून उप अभियंता, श्री. पवार व शाखा अभियंता श्री. भांडवलकर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अधिकारी असल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९८० नुसार निलंबनाची कारवाई करण्यासाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना दिनांक २९-१०-२०१५ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केलेले आहे. तसेच शाखा अभियंता, श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार निलंबनाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर) यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला आहे. चौकशीमध्ये आणखी असे निष्कर्ष काढण्यात आले आहे की, दिनांक ०१-०५-२००७ रोजीच्या ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांनी दुबार स्वाक्ष-या केल्याचे निदर्शनास येणे, नळ पाणी पुरवठा योजनेसाठी गठित केलेल्या समित्या शासनाच्या सूचनेप्रमाणे न होणे, पाईप टाकण्याचे खोदाई खडक कडक

असल्याने व भौगोलिक परिस्थिती नुसार योग्य असेल ते करुन घेणे गरजेचे असणे इत्यादी त्रुटी आढळून आलेल्या आहेत. याप्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेऊन उक्त साक्षीत संपूर्ण कामांची चौकशी करण्यात येऊन एका प्रकरणी एका सेवानिवृत्त अधिका-यांवर कारवाई करण्यात आले नसल्याने समितीने याबाबत कार्यवाही करण्याचे निदेश दिले असता विभागीय सचिवांनी या संदर्भात विधी व न्याय विभागाकडून अभिमत घेऊन या प्रकरणी एका सेवानिवृत्त अधिका-यावर कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. सद्यस्थितीत हे काम पूर्ण झाले असून या योजनेतून उक्त गावाच्या ठिकाणी आता सुरळीतपणे पाणीपुरवठा सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले. सदर योजनेच्या कामाची किंमत ४४ लाख ६६ हजार इतकी होती. आता योजना पूर्ण करण्यासाठी जी रक्कम लागणार आहे ती यापूर्व काळात ज्यांनी हे काम घेतलेले होते त्याच्यांकडून ती वसूल करण्याची रितसर तरतुद नियमात असल्यामुळे त्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे समितीस आश्वासित केले. मा. उच्च न्यायालयात देखील या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे निदेश दिले होते.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता याप्रकरणी समितीने सर्व अधिका-यांविरुध्द जी कार्यवाही प्रस्तावित केली आहे. त्याची चौकशी येत्या तीन महिन्यात पूर्ण करावी तसेच सेवानिवृत्त अधिका-यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा कसे याबाबत अभिमत विधि व न्याय विभागामार्फत घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याच प्रमाणे योजनेत शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत सर्व संबंधित जबाबदार दोषींकडून सदर रक्कम वसुल करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी, त्याचप्रमाणे तीन महिन्यात समितीस कळवावी. जो कंत्राटदार दोषी आहे त्याला काळ्या यादीत टाकावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा माहिती समितीकडे तीन महिन्यात सादर करण्यात यावी.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मौजे ढाकाळे, ता. बारामती येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ढाकाळे यांच्यामार्फत ठेकेदार नेमून करण्यात आली होती. तसेच तांत्रिक सेवा पुरवठादाराद्वारे कामाची देखरेख व देयके तयार करण्यात येत होती. समितीद्वारे झालेल्या अनियमीततेबाबत वडगांव निंबाळकर, ता. बारामती येथील पोलीस स्टेशनला दिनांक १६-११-२०१५ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला असून दिनांक २-४-११-२०१५ रोजी संबंधित पोलीस स्टेशनने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

१. श्री. व्ही. एम. तंवर, कार्यकारी अभियंता यांचेवर प्रशासकीय कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने दिनांक ३०-०६-२०१५ रोजी शासनाकडे सादर केलेला आहे.

२. श्री. मनिष पवार, उप अभियंता व श्री. भांडवलकर, शाखा अभियंता हे दोन्ही कर्मचारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील असल्याने त्यांची विभागीय चौकशी करुन कारवाई करणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळास या कार्यालयाचे पत्र जाक्र/ जिप/ग्रापापु/आस्था/ १४५/१६, दि. १७-०३-२०१६ अन्वये कळविले आहे.

३. श्री. ए. बी. बोराटे, शाखा अभियंता यांची बांधकाम विभाग, जि. प., पुणे कडील आदेश जा.क्र. जिप/ बांध/आस्था-१/ ९१७/२०३४/१५, दिनांक ०४-११-२०१५ अन्वये माहे जुलै २०१६ ची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेली आहे.

४. सदर कामाचे ठेकेदार श्री. दिलीप जगताप यांना काळया यादीत टाकण्याबाबतचा प्रस्ताव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ढाकाळे यांनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडे दिनांक २९-०४-२०१६ रोजी सादर केला आहे. तसेच जिल्हा परिषदेकडुन मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. २०६/१७, दि.२५-०४-१७ व जा.क्र. ७६, दि. १७-०६-१७ अन्वये सदर ठेकेदार काळया यादीत टाकणेच्या कारवाई करणेबाबत कळविले आहे.

५. सदर योजनेचा पाणी पुरवठा दिनांक ०२-१०-२०१५ पासुन चालू केला असुन योजनेचे काम माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये पुर्ण झाले आहे. सदरची योजना दिनांक २५-०७-२०१६ रोजी ग्रामपंचायत ढाकाळे यांचेकडे हस्तांतरीत केली असुन योजना ग्रामपंचायत ढाकाळे चालविते. सदर योजना उशिराने पुर्ण करणा-या ठेकेदाराकडुन कामाचे अंतिम बीला नुसार रक्कम रु. १५,५६,२४४/- एवढी एकुण रक्कम वसुल करण्याविषयी या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिप/ग्रापापु/तांशा/२१३/१७, दिनांक १६-०३-२०१७ अन्वये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ढाकाळे यांना कळविले होते. तथापि समितीकडुन काही कार्यवाही

झाली नसलेमुळे तहसिलदार, बारामती यांचेमार्फत संबंधित ठेकेदार यांच्यामालकिच्या मालमत्तेचे ७/१२ व ८ अ वर बोजा चढविण्याची कार्यवाही करणेबाबत उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, बारामती यांना या कार्यालयाचे पत्र क्र. लेखा/ ६४४/२०१७, दि. १९-०६-१७ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा बारामती यांनी त्यासंदर्भात तहसीलदार बारामती यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र ग्रापापु/ग्रापापु/आस्था/३९७/१७, दिनांक २१-०६-२०१७ अन्वये कार्यवाही करणे बाबत कळविले होते. तसेच उपविभाग बारामती यांनी त्यांचेकडील प.क्रजिप/ग्रापापु/वशी/४००/१७, दिनांक २८-०६-२०१७ अन्वये संबंधितांचे मालकीच्या मालमत्तेवर बोजा चढविणेचा प्रस्ताव तहसीलदार बारामती यांचेकडे सादर केला असून त्यांचेशी याबाबत समक्ष चर्चा केली असता त्यांनी सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे सादर करावा असे सूचविले आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिप/ग्रापापु/तांशा/७८०/१७, दिनांक१०-७-२०१७ अन्वये जिल्हाधिकारी पुणे यांना संबंधित ठेकेदार यांच्या मालकीच्या मालमत्तेचे ७/१२ व ८अ वर बोजा चढविण्याबाबत आपले मार्फत तहसीलदार बारामती यांना आदेश होणे बाबत ळवावे असे पत्र दिले आहे. त्यानुसार उपविभाग बारामती यांनी त्यांचेकडील पत्र क्रग्रापापु /आस्था/२५६/६८०/दि. २४-११-२०१७, अन्वये मौजे ढाकाळे, ता. बारामती या कामाची वसुलीची रक्कम १५५६२४४/- चा बोजा संबंधितांचे ७/१२ उता-यावर नोंद करणेत आल्याचे कळविले असून सोबत ७/१२ उता-याची सत्य प्रत सादर केली आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

श्री. तंवर सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता ग्रापापु जि प पुणे यांच्यावरील शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव सेवानिवृत्तीच्या दिवशी शासनास सादर करण्यात आला आहे. परंतु त्यांचे वरील चौकशीची कार्यवाही माहे मे २००९ पसून जिल्हा परिषदेद्वारा सुरू करण्यात आली आहे. श्री. तंवर यांच्यावरील विभागीय कार्यवाही सेवानिवृत्तीपुर्वी सुरू करण्यात आली आहे. सक्षम प्राधिकारीयांनी दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नियम २७(२)(ए) मधील तरतूद विचारात घेता श्री. तंवर यांचेवर शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास या विभागाच्या दि. ७-१-२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त कार्यवाही चालू आहे. तसेच इतर संबंधित दोषींविरुध्दची कार्यवाही महाराष्ट्रजीवन प्राधिकरणामार्फ़त कार्यवाही चालू आहे.

सेवानिवृत्त अधिका-यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिमत मिळण्याकरीता प्रस्ताव विधी व न्याय विभागास दि. ३०-३-१७ रोजी सादर केला आहे.

सदर प्रकरणी ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या पत्र क्र व्हीपीएम २००९/प्रक्र/९४/पंरा३ दि.२८-०९-२०१० तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पत्र क्र. पापुयो २०१०/व्ही५५/पापु१७ दि. ७-१०-२०१० च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिप पुणे यांना संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू श्री तंवर यांचेवरील शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव विलंबाने म्हणजे श्री तंवर यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी म्हणजे दि. ३०-६-२०१५ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.त्या अनुषंगाने सदर प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागास व ग्रामविकास व जलसंधारण विभागास सादर करण्याबाबत दि ७-१०-१७ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिप पुणे यांना कळविले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने उपरोक्तविषयाच्या संदर्भात कारवाई केली आहे व वसुली केली आहे काय अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, कारवाई झाली आहे. संबंधिताच्या ७/१२च्या उता-यावर बोजा टाकण्याचे काम केले आहे. वसुली झालेलीनाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वसुली तात्काळ केली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्ही वसुलीची प्रक्रिया सुरु केली आहे. संबंधित ठेकेदाराच्या ७/१२ च्याउता-यावर त्या रकमेचा बोजा टाकण्याची विनंती जिल्हाधिका-यांना केली आहे, त्याप्रमाणे तसे झाले आहे. आरआरसीची एक मोठी प्रक्रिया असते. रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट वगैरे तयार करावे लागते. आम्ही त्याच्या विरुध्द कायदेशीर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करु.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली दोनच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की,मौजे ढाकाळे ता.बारामती या गावातील नळपाणी पुरवठा योजनेबाबत गंभीर बाबी निदर्शनास आणून देखील प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे.या संपूर्ण कामामध्ये गैरप्रकार व अनियमितता झाली आहे ही योजना लोकांपर्यंत पोहोचली नाही तसेच प्रशासनाच्या वतीने संबंधितांविरूध्द कारवाई करण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तिका (एमबी रेकॉर्ड) बनावट आहे. अनियमिततेमुळे सात वर्ष पिण्याचे पाणी मिळू शकले नाही, सदर योजनेचे काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे असून सदर कामावर रुपये १७ लाख ७८ हजार एवढा खर्च होऊनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला असून मौजे ढाकळे, ता.बारामती पाणीपुरवठा योजनेची समिती गठित करण्यासाठी घेण्यात आलेल्या दिनांक १ मे, २००७ रोजीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी दुबार स्वाक्ष-या केल्याचे निदर्शनास आले. या योजनेसाठी गठीत केलेल्या समित्या शासनाच्या सूचनेप्रमाणे झालेल्या नाहीत. जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती नुसार याप्रकरणी ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असल्याने जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरून पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित उपअभियंता, श्री. पवार, शाखा अभियंता, श्री. भांडवलकर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडील असल्याने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार निलंबनाच्या कारवाईसाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना सामान्य प्रशासन विभागातर्फे सादर केलेले आहे. तसेच शाखा अभियंता, श्री. बोराटे यांच्या निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव बांधकाम विभाग यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला असून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. सदर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीद्वारे झालेल्या अनियमिततेप्रकरणी वडगाव निंबाळकर, तालुका बारामती येथील पोलीस स्टेशनला दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला असून ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती तसेच तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्याविरुध्द एफआयआर दाखल करण्यात आला आहे. श्री. व्ही. एम. तंवर, कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने दिनांक ३० जून, २०१५ रोजी शासनाकडे सादर केला आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. त्याच प्रमाणे श्री. मनिष पवार,उप अभियंता व श्री. भांडवलकर शाखा अभियंता यांचेविरुध्द केलेल्या कारवाई बाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी. तसेच सदर कामाचे ठेकेदार श्री. दिलीप जगताप यांना काळया यादीत टाकण्याबाबतच्या प्रस्तावावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कारवाईची माहिती समितीला तसेच ठेकेदाराच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याची कार्यवाही करुन कामाची रुपये १५,५६,२४४/- एवढी रक्कम वसूल करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहत नसल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हयातील बारामती पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये जि.प. तील कोणकोणत्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला कधी व किती भेटी दिल्या, तसेच किती विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहिले, भेटी कमी दिल्या असल्यास त्याची कारणे काय आहेत, त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अहवाल वर्षात जिल्हा परिषदेच्या पुढील विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी १, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी ५, कार्यकारी अभियंता (ग्रापापु) यांनी १, कार्यकारी अभियंता (छोपावि) यांनी २, पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी २, कार्यकारी अभियंता (इवद) यांनी १, समाजकल्याण अधिकाऱ्यांनी २ भेटी दिल्या असून, कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे पंचायत समिती स्तरावरील एका मासिक सभेला उपस्थित राहिले.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पंचायत समितीला एकही भेट न देण्याची कारणे काय आहेत, त्यावर गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, रेकॉर्डवरुन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी पंचायत समितीला भेट दिल्याचे दिसून येत नाही.

समितीच्या मते वास्तविक पाहता विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी देऊन, मासिक सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु अनेक विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी दिल्या नसल्याचे दिसून येते. तसेच बहुतांश विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला सुध्दा उपस्थित राहिले नाहीत. त्यावर गट विकास अधिकारी यांनी स्पष्ट केले की, केवळ एकच विभाग प्रमुख पंचायत समितीच्या एका मासिक सभेला उपस्थित होते.

समितीने पुन्हा अशी विचारणा केली की, पंचायत समितीच्या मासिक सभांच्या तारखा विभाग प्रमुखांना कळविल्या होत्या काय याचे गट विकास अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. समितीच्या मते जिल्हा परिषदेच्या काही विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला कमी भेटी दिल्याचे आणि काही विभाग प्रमुखांनी भेटीच दिल्या नसल्याचे दिसून येते. केवळ कार्यकारी अभियंता, (बांधकाम) हे पंचायत समितीच्या एका मासिक सभेस उपस्थित होते. इतर कोणीही विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला उपस्थित नव्हते. त्यामुळे हा मुद्दा साक्षीला घेण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता (पाणी व्यवस्थापन कक्ष), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), कार्यकारी अभियंता (बांधकाम) इत्यादींनी पंचायत समितीला एकदाही भेट दिली नाही. त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना पत्र लिहून सदरहू विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी का दिल्या नाहीत आणि मासिक सभेला उपस्थित का राहिले नाहीत याबाबत संबंधितांकडून खुलासा मागावावा. असेही निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

प्रश्नावली क्र. २ वरील साक्षी दरम्यान अहवाल वर्षात संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत. याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा असे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार काय कारवाई केली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था/१२/१२१/१२, दि. २/४/२०१२ अन्वये जिल्हा परिषदेतील खातेप्रमुखांना पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहणेकरिता सन २०१२-१३ या वर्षाकरिता कार्यक्रम देणेत आलेला होता सदर कार्यक्रमाप्रमाणे १६ खातेप्रमुखांना १३ पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहणेबाबत एकुण १८६ उद्दिष्ट देणेत आलेले होते. त्यापैकी १३ उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

तसेच संबंधित खाते प्रमुखांकडून इकडील का.दा.नो क्र साप्रवि/आस्था /१२/३८८/१५, दि. २३/१०/२०१५ अन्वये लेखी खुलासा मागविणेत आलेला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही, प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या दि. २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत.

**पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.**

समिती राज्यात अनेक ठिकाणी जिल्हा परिषदांना भेट देत असताना जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहत नाहीत व पंचायत समितीमध्ये आवश्यक तेवढे दौरे देखील काढत नाहीत असे समितीला आढळून आले आहे. पुणे जिल्ह्यात देखील सदरची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा असे समितीने निदेश दिले होते त्यानुसार समितीला चौकशी अहवाल पाठविणे अभिप्रेत होते. तथापि, जिल्हा परिषदेने या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा चौकशी अहवाल समितीला पाठविला नाही, समिती या बाबत तीव्र नाराजी व्यक्त करते.

जिल्हा परिषदेकडून याबाबत अशी माहिती प्राप्त झाली की, या कार्यालयाकडून परिपत्रक क्र.साप्रवि/ आस्था / १२/१२१/१२ दिनांक २.४.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांना पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहण्याकरिता सन २०१२ या वर्षाअखेर कार्यक्रम देण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाप्रमाणे १६ खातेप्रमुखांना १३ पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहण्याबाबत एकूण १८६ उद्दीष्ट वाटून देण्यात आलेले होते. पैकी १३ साध्य झालेले आहे. तसेच संबंधित गट प्रमुखांकडून दिनांक २३.१०.२०१५ अन्वये लेखी खुलासा देखील मागविण्यात आलेला आहे. ग्रामविकास विभागाकडून देखील या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांच्या स्तरावरील कार्यवाही प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने विहित केलेल्या कालमर्यादेत चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल

सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. उपरोक्त माहिती विचारात घेता अहवाल तयार करीत असल्याबाबत याबाबत कुठल्याही प्रकारचा लेखी खुलासा समितीला प्राप्त झाला नाही.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभाग प्रमुखांनी मासिक सभेला अनुपस्थित राहण्याबाबत त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबत त्यांचे खुलासे मागविण्यात आले आहेत आणि अद्यापपर्यंत त्यांचे खुलासे प्राप्त झालेले नाहीत असे उत्तर समितीला देण्यात आलेले आहे. सदरची बाब अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर असून समितीने निदेश देऊन देखील सदरहू अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत खुलासा सादर न करणे हे अत्यंत गंभीर व समितीचा अवमान करणारे कृत्य आहे. या प्रकरणात जिल्हा परिषदेने ज्या विभाग प्रमुखांना त्यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत आणि त्यांचेकडून खुलाशाचे उत्तर वेळेवर पाठविण्यात आलेले नाही अशा अधिकाऱ्यांच्या खुलाशांची/ त्यांच्या उत्तराची वाट न पाहता सर्व संबंधितांची एक वेतनवाढ तात्पुरती थोपविण्यात यावी व त्यांच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा.पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दि १०/८/२०१५ ते १३/०८/२०१५ दिलेल्या भेटीचे वेळी सन २०१२-२०१३ दरम्यान विभाग प्रमुखांनी पंचायत समिती मासिक सभांना अनुपस्थित राहिलेल्या खाते प्रमुखांबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यावेळी खालील विभाग प्रमुखांना दि २३/१०/२०१५ अन्वये खालील विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचे खुलासे मागविण्यात आलेल्या व खुलासे सादर केलेल्या व खुलासे सादर न केलेल्या अधिका-यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अधिका-याचे नाव | पदनाम | खुलासा प्राप्त/अप्राप्त |
|---|---|---|---|
| 1) | डॉ श्री एस बी कोकणे | तत्का.जिल्हा आरोग्य अधिकारी | खुलासा अप्राप्त |
| 2) | श्री बी के दहिफळे | तत्का शिक्षणाधिकारी (माध्य) | खुलासा अप्राप्त |
| 3) | श्री बी जी पलघडमल | तत्का कृषी विकास अधिकारी | खुलासा प्राप्त |
| 4) | श्री आर एस धुमाळ | तत्का कृषी विकास अधिकारी | खुलासा अप्राप्त |
| 5) | श्री एस आर कदम | तत्का समाजकल्याण अधिकारी | खुलासा अप्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| 6) | श्री आनंद पुसावळे | तत्का उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | खुलासा प्राप्त |
| 7) | श्री जे आर विभुते | तत्का कार्यकारी अभियंता बांध (उ) | खुलासा अप्राप्त |
| 8) | श्री एन डी देशमुख | तत्का जिल्हा आरोग्य अधिकारी | खुलासा प्राप्त |
| 9) | श्री जितेंद्र कोळंबे | तत्का मुख्य लेखा व वित्त अधिकारी | खुलासा प्राप्त |
| 10) | श्री आनंद भंडारी | तत्का उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) | खुलासा प्राप्त |
| 11) | श्रीमती नंदिनी घाणेकर | तत्का. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म बा क) | खुलासा अप्राप्त |

त्यानंतर १७/११/२०१५ ,१८/११/२०१५ तसेच दि २५/११/२०१५ रोजी झालेल्या विभागीय सचिव साक्षींच्या वेळी खुलासे अप्राप्त असलेल्या अधिका-यांच्या एक वेतनवाढी तात्पुरत्या रोखून सेवापुस्तिकेत नोंद घेण्याचे निर्देश मा.पंचायती राज समितीने दिले. उपरोक्त अधिका-यांपैकी १) श्री. एन. डी. देशमुख, तत्का, जिल्हा आरोग्य अधिकारी २) श्री.आनंद पुसावळे, तत्का उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) ३) श्री. जितेंद्र कोळंबे, तत्का मुख्य लेखा व वित्त अधिकारी ४) श्री. आनंद भंडारी, तत्का उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) ५) श्री. बी. जी. पलघडमल, तत्का कृषि विकास अधिकारी यांचे खुलासे प्राप्त असून त्यानंतर दि. १७/११/२०१५ , दि.१८/११/२०१५ तसेच दि. २५/११/२०१५ रोजी झालेल्या विभागीय सचिव साक्षींच्या वेळी खुलासे अप्राप्त असलेल्या अधिका-यांच्या एक वेतनवाढी तात्पुरत्या रोखून सेवापुस्तिकेत नोंद घेण्याचे निर्देश मा.पंचायती राज समितीने दिले. त्यानुसार खालील प्रमाणे अधिका-यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडील जा .क्र /७२३ ते ७२८ / आस्था ६/ साप्र/१७ दि २२/०६/२०१७ नुसार संबंधित प्रशासकीय विभागांना सादर केला आहे.

| अ.क्रं | अधिका-याचे नाव | पदनाम | प्रशासकीय विभाग |
|---|---|---|---|
| १) | डॉ. एस.बी. कोकणे | तत्का. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पुणे | सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई |
| २) | श्री बी. के. दहिफळे | तत्का.शिक्षणाधिकारी माध्य. जि.प.पुणे | मा. आयुक्त, शिक्षण मध्यवर्ती इमारत पहिला मजला, महाराष्ट्र राज्य |
| ३) | श्री. आर. एस. धुमाळ | तत्का. कृषि विकास अधिकारी जि.प.पुणे | मा. आयुक्त, कृषी व पदुम विभाग, पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | श्री. एस.आर. कदम | तत्का.समाजकल्याण अधिकारी जि.प.पुणे | मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग पुणे |
| ५) | श्री. जे. आर. विभुते | तत्का.कार्यकारी अभियंता बांधकाम उत्तर | मा. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे |
| ६) | श्रीमती नंदिनी घाणेकर | तत्का. उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.बा.कजि.प.पुणे | उपसचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग बांधकाम भवन, मुंबई |

तसेच संबंधित अधिका-यांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करणेकामी जोडपत्र १ ते ४ या कार्यालयाकडील जा .क्र /आस्था ६/ साप्र/ १०८४/१७ दि ०७/११/२०१७ नुसार मा विभागीय आयुक्त पुणे यांचेमार्फ़त अधिका-यांच्या संबंधित प्रशासकीय विभागाकडे पाठविणेकामी सादर करणेत आले आहेत.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**ग्रामविकास विभाग (आस्था -२) :-**

श्रीमती नंदिनी घाणेकर, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (म बा क), जिल्हा परिषद, पुणे यांच्या विरूध्द शिस्तभंग कारवाईस्तव प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे दि १९/१/२०१८ अन्वये प्राप्त असून सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, सदर बाबतीत ६ जणांचे खुलासे अप्राप्त आहेत. खुलासे प्राप्त होण्यास कोणत्या स्तरावर विलंब झाला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यांचे खुलासे मिळालेलेच नाहीत. त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करण्याचे प्रस्ताव पाठविले आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रस्ताव केव्हा पाठविले आहेत, दिनांक २३.१०.२०१५ अन्वये त्या विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. मात्र अजूनही त्यांच्याकडून खुलासे अप्राप्त असतील तर ती गंभीर बाब आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ११ अधिकारी होते, त्यातील ५ जणांचे खुलासे प्राप्त झाले आहेत, ६ जणांचे खुलासे अप्राप्त आहेत. त्यामुळे समितीने असे आदेश दिले होते की, त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात यावी. त्यामुळे सहाही अधिकाऱ्यांची एक वेतनवाढ रोखण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक २२.६.२०१७ ला पाठविले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, वेतनवाढ रोखली आहे का आणि त्या संदर्भातील नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेत घेतली आहे का ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ते अधिकार जिल्हा परिषदेला नाहीत. आम्ही त्या विभागांना प्रस्ताव पाठविले आहेत. ते वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांच्या विभागांकडे दिनांक २२.६.२०१७ ला प्रस्ताव पाठविले आहेत, ते वेगवेगळया विभागांचे अधिकारी आहेत. त्यातील एका अधिकाऱ्यांची वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, एक वर्षापासून या कारवाया होत नसतील तर योग्य नाही. त्यावेळी सर्व कागदपत्रे दाखविण्याची जबाबदारी त्यांची होती. काही लोक अहवाल देतात तर काही लोक अहवाल देत नाहीत, ही बाब बरोबर नाही. एक वर्ष कारवाया होत नसतील तर ते बरोबर नाही. कारवाई तात्काळ झाली पाहिजे, यासाठी एक वर्ष लागण्याचे काही कारण नाही. यामध्ये आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, कृषी विभाग, समाजकल्याण विभाग असे वेगवेगळे विभाग आहेत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की,सदर बाबतीत सर्व विभागांना सांगितले आहे. विभाग प्रमुख पंचायत समितीच्या सभेमध्ये उपस्थित नव्हते, हा मुद्दा आहे. ग्रामविकास विभागाचेही एक अधिकारी होते. श्रीमती नंदिनी घाणेकर, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी त्यामध्ये होत्या. आम्ही त्यांना नोटीस बजाविली आहे. संबंधित विभागांकडून सर्वांना एक वेतनवाढ का रोखण्यात येऊ नये या संदर्भात खुलासा मागविण्यात येईल. तो खुलासा त्यांना द्यावा लागतो. पंचायत समितीच्या सभेमध्ये ते उपस्थित नव्हते, त्यामुळे हा मुद्दा आला आहे. विभागाने श्रीमती नंदिनी घाणेकर, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नोटीस दिली आहे आणि त्यांनी येऊन खुलासाही दिला आहे, त्यावेळी त्या का गेल्या नाहीत, याबाबत त्यांनाही आठवत नाही. सभेमध्ये उपस्थित नव्हत्या

म्हणून हा विषय आला आहे. पंचायत समितीच्या मासिक सभेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा प्रतिनिधी म्हणून एका विभाग प्रमुखांनी गेले पाहिजे, त्या संदर्भातील हा विषय आहे. प्रॅक्टिकली त्यांना पनिशमेंट झाली आहे. कारण त्यांना इतक्या वर्षांनंतर नोटीस बजाविली आहे. प्रत्येक विभाग कारवाई करणार आहे. जिल्हा परिषदेला कारवाई करता येत नाही.

यावर समितीने असे निदेश दिले की, अप्राप्त खुलाशांच्या संदर्भात तात्काळ कारवाई करुन घेण्यात यावी.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद,पुणे अंतर्गत सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोनच्या अनुषंगाने बारामती पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांची साक्ष समितीने घेतली. सदर साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ मध्ये पुढील विभाग प्रमुखांनी बारामती पंचायत समितीला भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी १, मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी ५, कार्यकारी अभियंता (ग्रापापु) यांना १, कार्यकारी अभियंता (छोपावि) यांनी २, पशुसंर्वधन अधिकाऱ्यांनी २, कार्यकारी अभियंता (इवद) यांनी १, समाज कल्याण अधिकाऱ्यांनी २ भेटी दिल्या असून, कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे पंचायत समिती स्तरावरील एका मासिक सभेला उपस्थित राहिले व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी एकही भेट दिलेली नाही. वास्तविक पाहता विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी देऊन मासिक सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.

उपमुख्य कार्यकारी अभियंता (पंचायत), जिल्हा आरोगय अधिकारी, कार्यकारी अभियंता (पाणी व्यवस्थापक कक्ष), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), कार्यकारी अभियंता (बांधकाम) इत्यादींनी पंचायत समितीला भेटी दिलेल्या नाहीत. त्यामुळे उपरोक्त अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात यावा असे निदेश समितीने दिलेले होते.

१६ खाते प्रमुखांना १३ पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहणेबाबत एकूण १८६ उद्दिष्ट देण्यात आलेले होते. त्यापैकी केवळ १३ उद्दिष्ट साध्य झाल्याचे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तसेच ग्रामविकास विभागाने दिलेल्या लेखी माहितीनुसार ग्राम विकास विभागाच्या सचिवांनी

सदर मुद्यासंदर्भात दिनांक २३ ऑक्टोंबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राव्दारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करुन अहवाल सादर करण्याऱ्या सूचना दिलेल्या आहेत.

**अद्यापपर्यंत पंचायत समितीच्या मासिक सभेला उपस्थित राहत नसल्याबाबतचे विभाग प्रमुखांचे मागविण्यात आलेले खुलासे प्राप्त झालेले नाहीत. सदर बाब अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर असून खुलासे सादर न करणे हे अत्यंत गंभीर व समितीचा अवमान करणारे कृत्य असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांनी एक वेतनवाढ तात्पुरती थोपविण्यात येवुन त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात यावी अशी समितीने शिफारस केली होती. यावर ११ विभाग प्रमुखांकडून पंचायत समितीच्या मासिक सभेला अनुपस्थित राहिल्याबाबत खुलासे मागविण्यात आले होते. त्यापैकी ५ अधिकाऱ्यांचे खुलासे प्राप्त असून ६ अधिकाऱ्यांचे खुलासे अप्राप्त आहेत. खुलासे अप्राप्त असलेल्या अधिकाऱ्यांची एक वेतनवाढ तात्पुरती रोखून सेवा पुस्तिकेत नोंद घेण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना दिनांक २२ जून, २०१७ रोजी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यानुसार सदरहू प्रस्तावावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व संबंधित अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### ग्रामसेवक व शिक्षकांसह इतर कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी मध्ये पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हयातील इंदापूर व जुन्नर पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, किती ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत व ते मुख्यालयात न राहण्याची कारणे काय आहेत, अशा ग्रामसेवकांवर काय कारवाई करण्यात आली यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्हाला प्राप्त झालेल्या दाखल्यांच्या आधारे ग्रामसेवक मुख्यालयी राहतात अशा प्रकारचे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात फिल्डवर मात्र वेगळी परिस्थिती असते हे मी मान्य करतो. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामसेवकांनी मुख्यालयी राहावे या बाबत आपण पंचायत समिती स्तरावरुन काय प्रयत्न केले यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले नाही. समितीने आणखी विचारणा केली की, दाखल्याच्या आधारावर ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचे मान्य करावे, अशी नियमात तरतूद आहे काय यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीचे म्हणणे बरोबर असुन केवळ दाखल्याच्या आधारावर ग्रामसेवक मुख्यालयी राहत आहेत यावर विश्वास ठेवता कामा नये. या संदर्भातील खातरजमा प्रत्यक्षात फिल्डवर जाऊन करावयास पाहिजे.

समितीच्या मते ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसताना सुध्दा त्यांनी मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाचा दाखला सादर करणे योग्य नाही. समितीला वाटते अशा प्रकारांना आपण वेळीच आळा घातला पाहिजे. समितीला भेटीच्या दरम्यान जे चित्र पहावयास मिळाले त्यावरुन ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याचे स्पष्ट होते. जर ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसतील तर नियमानुसार त्यांचा घरभाडे भत्ता अदा करता कामा नये. शाळा व्यवस्थापन समिती आणि सरपंचांशी आर्थिक व्यवहार करुन ग्रामसेवक प्रमाणपत्र मिळवितात. वास्तविक पाहता शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद आहे की, जे शिक्षक किंवा ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी. त्यामुळे जे ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत त्यांच्यावर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात

यावे. मध्यंतरी पंचायती राज समितीला दौऱ्याच्या वेळी आढळून आलेल्या बाबींच्या संदर्भात समितीने निर्देश दिल्यानंतर शासनाने मुख्यालयी राहण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला.

समितीने जुन्नर पंचायत समिती येथे गट विकास अधिकारी यांची साक्ष घेऊन अशी विचारणा केली की, किती ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत व ते मुख्यालयी न राहण्याची कारणे काय आहेत, अशा ग्रामसेवकांवर काय कारवाई करण्यात आली. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात. आमच्याकडे त्या संदर्भात सरपंचांचे प्रमाणपत्र आहे. यावर समितीने आपण पंचायती राज समितीला असत्य स्वरूपाची माहिती देत आहात. राज्यातील कोणतेही ग्रामसेवक शहरात राहत नाहीत. ग्रामसेवकाला खेडेगावात राहावे लागते, त्यामुळे त्याला भत्ता दिला जातो आणि तरीही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसेल तर ते योग्य नाही. शासनाची फसवणूक करीत आहेत असे प्रतिपादन करुन जे ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत त्यांना नोटीस काढण्यात यावी. आदिवासी गावात तर ग्रामसेवकाने राहिले पाहिजे. ग्रामसेवक हा गावाचा सेवक असतो. त्यामुळे त्याने मुख्यालयी राहणे आवश्यकच आहे. त्यामुळे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांनी ग्रामसेवकांच्या मुख्यालयी राहण्याच्या विषयाच्या संदर्भातील सत्य माहितीचा अहवाल ८ दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा असे समितीने निदेश दिले त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीच्या निर्देशाचे तंतोतंत पालन करून समितीला अहवाल सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

समितीने तद्नंतर दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी जिल्हा परिषद सभागृह पूणे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेऊन सदरहू विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०१२-१३ वार्षिक प्रशासन अहवाल प्रश्नावलीमधील शिक्षण विभागाबाबत पान क्रमांक ४८ वरील मुख्यालयी राहण्याबाबतच्या विषयासंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नास जिल्हा परिषदेने उत्तर दिलेले आहे की, "अहवालवर्षी पंचायत समिती अंतर्गत सर्व ११,१३१ कार्यरत प्राथमिक शिक्षक मुख्यालयी राहत असल्याचे आढळून आले आहे". सदरील उत्तर चुकीचे आहे, असा समितीचा आक्षेप आहे. जे शिक्षक मुख्यालयी राहत नव्हते, त्यांच्यावर जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच, त्यापुढील प्रश्नास दिलेल्या उत्तरामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सर्व शिक्षक मुख्यालयी राहत असल्याने त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. समितीला दिलेल्या प्रश्नाचे सदरचे उत्तरही खोटे असून ही अतिशय गंभीर बाब आहे. सर्वच पंचायत समिती क्षेत्रातील शिक्षक खरोखर मुख्यालयी राहतात का,

समितीला खोटे उत्तर देण्याचे धाडस जिल्हा परिषदेने कसे केले, समितीने जुन्नर पंचायत समितीस भेट दिली होती त्यावेळी या विषयाप्रकरणी गट विकास अधिकारी यांनी तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांना सादर करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. जवळपास ८० टक्के ग्रामसेवक हे शहरामध्ये राहत आहेत, मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाहीत. शिक्षक व ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नाहीत. परंतु समितीला यासदंर्भात उत्तर देताना, सरपंचाच्या दाखल्यानुसार ते मुख्यालयी राहतात, असे गृहीत धरुन उत्तर देण्यात आले आहे, त्यासंदर्भात कोणतीही उलट तपासणी करण्यात आली नाही. सरपंचाचा दाखला घेऊन ग्रामसेवक व शिक्षक हे शासनाकडून घरभाडे भत्ता घेतात, परंतु प्रत्यक्षात ते सदर ठिकाणी राहत नाहीत. याबाबत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा करण्यात सांगितल्यावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, सदर प्रश्नाचे उत्तर समितीला सादर करीत असताना, संबंधित केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला व त्यानुसार उत्तर देण्यात आले आहे. समितीच्या मते सरपंच व शाळा समितीचे दाखले गृहीत धरुन शिक्षक व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात, असे उत्तर देऊन जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल केली आहे.

जिल्हा परिषदेने या विषयाच्या संदर्भात आढावा घ्यावा. शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत हे योग्य नाही. सदर बाबतीत नोव्हेंबर, २००० चा शासन निर्णय आहे, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करावी आणि सदर कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे अश्वासन दिले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

ग्रामसेवक मुख्यालयी राहात असल्याबाबत सरपंचांनी दिलेला दाखला ग्राह्य धरणे योग्य आहे काय, यामध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे तेव्हा शासनाची याबाबत नेमकी भुमिका विशद करावी.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक क्र.पराप क्र.२३२/आस्था-९ मंत्रालय, मुंबई दिनांक ५ जुलै, २००८ **(परिशिष्ट ६.१)** या परिपत्रकाद्वारे सुचित केलेनुसार मुख्यालयी न राहणा-या जिल्हा कर्मचा-यांविरुध्द कारवाई करणेबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिप/ पंचा/७/४३/२०१५ दिनांक २१/०२/२०१५ नुसार कळविण्यांत

आलेले असून जे कर्मचारी मुख्यालयी राहत असलेबाबतचा दाखला सादर करणार नाहीत अशा कर्मचा-यांचे घरभाडे भत्ता रोखण्यांबाबत स्पष्टपणे कळविण्यांत आले आहे.

सद्यस्थितीमध्ये पुणे जिल्हयांतर्गत पंचायत समिती अंतर्गत काम करणा-या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी राहत असलेबाबत सरपंच यांचे दाखले पंचायत समिती स्तरावर घेण्यांत आलेले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३८ नूसार सरपंच हे पंचायतीचे कार्यकारी अधिकारी आहेत.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक दि. १३-१-१९८९, दि..१४-११-२०००, दि..१३-१२-२००१, दि.२४-७-२००२, दि. ८-३-२००४, दि.६-१-२००६, दि. ५-७-२००८, दि. ३-११-२००८ अन्वये जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे. या संदर्भात मा. पंचायत राज समितीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार ग्राम विकास विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली आहे.

मात्र वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक ५-२-१९९० अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारीत दराने घरभाडे भत्ता देण्याबाबत जो निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये "ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडे भत्ता पात्रतेसाठी विहित केलेली शर्त काढून टाकण्यात येत आहे." असे विनिर्दिष्टपणे नमूद केलेले आहे. वित्त विभागाने निर्गमित केलेला सदरहू निर्णय व ग्रामविकास विभागाने परिपत्रकान्वये घेतलेला निर्णय परस्पर विरोधी असल्याने शिक्षकांच्या संघटनेमार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ५८२२/२०१५ मध्ये ग्राम विकास विभागाने परिपत्रकान्वये घेतलेला निर्णय मा. न्यायालयाने दि. १९-१०-२०१५ च्या आदेशान्वये रद्दबादल ठरविलेला आहे व कर्मचाऱ्यांचा घरभाडे अदा करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सद्य:स्थितीत मा. न्यायालयाने दिलेले आदेश, मा. पंचायत राज समितीने केलेल्या शिफारशी, ग्रामीण पातळीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांची मुख्यालयी राहण्याची आवश्यकता या याबाबी विचारात घेऊन वित्त विभागाच्या मान्यतेने आवश्यक तो निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तूत निर्णय घेतानाच कर्मचाऱ्यांनी ग्रामीण पातळीवर रहिवासाचा दाखला निश्चित कसा घ्यावा याबाबतही आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

**पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पूणे जिल्हा परिषदेला भेटी दिली. सदर भेटीच्या वेळी सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावीरल सादर करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक प्रश्नावली क्रमांक १ व २ बाबत समितीने माहिती घेतली असता ग्रामसेवक, शिक्षक व इतर वर्ग ३ चे कर्मचारी शासनाच्या नियमानुसार बंधनकारक असूनही ते मुख्यालयी रहात नसलयावर शासन निर्णय व नियमाप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसतानाही तो अदा करण्यात येत असलयाचे समितीस आढळून आले. समितीसला सांगण्यात आले की, संबंधीत गावाच्या ग्रामपंचायतीचे सरपंचाचे निवासाचे दाखले घेणे ग्राहय धरुन कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता अदा केला जात आहे. अशाप्रकारे सरपंचाचे दाखले झेणे नियमानुसार आहे का, याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेवून विचारणा केली असता यावर विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, ग्रामसेवकांनी मुख्यालयात राहणे आवश्यक आहे. या बाबतीत आम्ही शासनाचे परिपत्रक काढलेले आहे. परंतु, नुकताच माननीय उच्च न्यायालयाचा एक निर्णय आलेला आहे. रिट पिटिशन क्रमांक ५८२२/२०११ चा निर्णय १९/१० ला आलेला आहे. आम्ही याचा थोडा अभ्यास करीत आहोत. त्यांनी काही तरी तांत्रिक मुद्दा काढला आहे असे दिसून येत आहे. काही विसंगती आहे, वित्त विभागाने काही दिलेले आहे, त्या सर्वांचा आम्ही एकत्रपणे अभ्यास करुन परत सांगु.

शिक्षक, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी इतर वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्याच्या निर्णया मागे फार व्यापक दृष्टिकोन आहे. सध्या जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या/ग्रामसेवकांच्या बाबतीततील परिस्थीती त्यांनी निवासस्थानी रहाणे अत्यंत आवश्यक असुन शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा उद्देश सफल होण्याकरीता ज्या योजनांचा ज्या समाजाला लाभ व प्रसार प्रचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या मुख्यालयी राहणा-या कर्मचा-यांच्या काही समस्या देखील जाणुन घेणे आवश्यक आहे. त्यांना शासनाकडुन पुरेसी निवास व्यवस्था उपलब्ध नसणे, ग्रामस्तरावर भाडे तत्वावर निवास व्यवस्था उपलब्ध होण्यास अडचणी असणे इ. मुलांच्या अथवा अन्य कौटुंबिक समस्या इ.बाबत अडचणी शासनाने विचारात घेत असताना सदरचे कर्मचारी

मुख्यालयी कसे राहतील याबाबत कार्यकारी संघटनांशी चर्चा करणे. बदली धोरणात सकारात्मक बदल करावा तसेच मा. उच्च न्यायालयाने अलीकडेच घरभाडे भत्त्यासंदर्भात जो निर्णय दिला त्याचाही सर्वकष विचार करुन यासंदर्भात नव्याने निर्णय होण्याची आवश्यकता आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते म्हणुन या प्रकरणी ग्रामविकास विभागाने, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग, महसूल विभाग इ. सर्वसंबधित विभागांशी एकत्रित बसुन चर्चा करुन मुख्यालयी राहणा-या कर्मचा-यांना निवास व्यवस्था उपलब्ध करुन त्याबरोबरच त्यांना अजुन कोणत्या आवश्यक त्या सुविधा देता येतील याबाबत सर्वकष विचारविनिमय करुन सर्वंकष शासन निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा. पंचायती राज समितीने शिफ़ारस केल्याप्रमाणे कर्मचा-यांना घरभाडे भत्ता देताना मुख्यालयी रहाणे बंधनकारक करण्याबाबतचा निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र घभाभ-१०१५/प्रक्र१/सेवा-५ दि ७ ऑक्टोबर २०१६ **(परिशिष्ट ६.२)** अन्वये निर्गमीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदे कडून कार्यवाही करण्यात येत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**ग्रामविकास विभाग (आस्था १० ) :-** जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. ग्रामसेवक, शिक्षक व इतर कर्मचारी मुख्यालयी राहत नसणे हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. ग्रामविकास विभागाने या संदर्भात निदेश दिले पाहिजेत अशी विचारणा समितीने केली असता

सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागाकडून निदेश दिले आहेत. घरभाडे भत्याच्या संदर्भातील नियमही बदलले आहेत. सदरहू नियम वित्त विभागाकडून मंजूर केले आहेत आणि घरभाडे भत्ता बंद केला आहे. विभाग जे अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत अशा सर्व संबंधितांवर कारवाई करीत आहे, आता ते मुख्यालयी राहत आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, उपरोक्त कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. प्रत्येक जिल्हा परिषदेत न राहणारे लोक आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सदर विषयाच्या बाबतीत प्रशासनिक तपासणी करणे, कारवाई करणे आवश्यक आहे. अजून विभाग जे अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत अशा सर्व संबंधितांवर कापण्यात आलेले नाही.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागाने घरभाडे भत्ता देणे बंद केले आहे. वित्त विभागाकडून या संदर्भातील शासन निर्णयही बदलून घेतला आहे. पूर्वी सन १९९१ चा घरभाडे भत्ता संदर्भातील शासन निर्णय होता. तो आता शासन निर्णयच बदलला आहे. समितीने यापूर्वी दिलेल्या निदेशानुसार संबंधितांकडून घरभाडे भत्ता वसूल करण्यात आला आहे. मात्र १०० टक्के लोक राहत आहेत, असे आम्ही सांगू शकत नाही. आता देखील २०-२५ टक्के लोक मुख्यालयी राहत नाहीत. दक्षता घ्यावी, कारवाई करावी, असे सांगणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काम झाले आहे. ते कारवाई करीत राहतील, तसे ते प्रमाण कमी होत जाईल.

आता शिक्षक गावात राहत नाहीत, हे सत्य आहे, त्याप्रमाणे शासन निर्णय काढून त्यांना घरभाडे देय नसल्याचे सांगितले आहे. कर्मचाऱ्यांच्या त्या संदर्भात काही अडचणी देखील आहेत. शासन निर्णयात काही बदल करावा, जेणेकरुन अधिकाऱ्यांनाही सवलत होईल. महिलांच्या काही अडचणी असतात, त्यामुळे त्यांना तेथे राहणे योग्य होत नाही. ग्रामीण भागात घरच मिळत नाही, अशीही अडचण असू शकते. यामध्ये काही तरी मार्ग काढावा, जेणेकरुन या बाबी होणार नाहीत. हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. काही ठिकाणी भाड्याने घर मिळत नाही. या संदर्भात काही तरी काँक्रिट पॉलिसी तयार करावी असे समितीने मत व्यक्त केले. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, तत्संदर्भात विचार करावा लागेल. पण काही मूभा दिली तर त्याचा फायदा घेऊन लोक काही वेगळेच करतील. शिक्षकांच्या संदर्भात अवगत क्षेत्र व सर्वसाधारण क्षेत्र असे केले आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, शासन निर्णय तसाच ठेवावा आणि दुसरा विषय म्हणून काही तरी कारवाई करावी. काही ठिकाणी काही अंशी त्यांना धाक राहील की कारवाई होत आहे, जेणेकरुन ते काही प्रमाणात अपडेट राहतील. त्यासंदर्भात विभागाने कारवाई करावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, एचआरए हा विषय बाजूला ठेवून दुसरी कारवाई करु. सदर बाबतीत पॉलिसी बनविण्यासाठी २-३ गट विकास अधिकारी, उपायुक्त, १-२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवडून त्यांची समिती बनवितो, ते मला त्या संदर्भात सजेस्ट करतील. कारण या संदर्भात प्रॅक्टिकल सोल्युशन काढावे लागेल, जेणेकरुन त्याचा गैरफायदाही होऊ नये आणि जेन्युईन लोकांना फायदा मिळावा. सदर बाबतीत खरोखर काही तरी मार्ग काढावा असे समितीने मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत इंदापूर व जुन्नर पंचायत समितीला समितीने भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षीच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली दोन च्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, ग्रामसेवक व शिक्षक यांनी सादर केलेल्या दाखल्याच्या आधारे ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात मुख्यालयी राहत नाहीत, मुख्यालयी राहत असल्याबाबत सरपंचाचा दाखला सादर करणे योग्य नाही. ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसताना त्यांच्या घरभाडे भत्ता अदा करता कामानये शाळा व्यवस्थापन समिती आणि सरपंचांशी आर्थिक व्यवहार करुन ग्रामसेवक प्रमाणपत्र मिळवतात.

दिनां ५ जुलै, २००८ रोजी परिपत्रकाद्वारे सुचित केल्यानुसार मुख्यालयी न राहणाऱ्या जिल्हा कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना जिल्हापरिषदेने दिनांक २१/०२/२०१५ रोजी कळविले असून जे कर्मचारी मुख्यालयी राहत असल्याबाबतचा दाखला सादर करणार नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे घरभाडे रोखण्याबाबत स्पष्टपणे कळविण्यात आल्याचे जिल्हापरिषदेने लेखी माहितीव्दारे समितीस कळविले आहे. तसेच ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती नुसार मुख्यालयी राहण्याबाबतचा निर्णयासंदर्भात विभागाने जे परिपत्रक निर्गमित केलेले आहे ते परस्परविरोधी असल्याने शिक्षकांच्या संघटनेमार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीड, औरंगाबाद येथे परिपत्रकामधील निर्णय दिनांक १९/१०/२०१५ च्या आदेशान्वे रद्दबातल ठरविले असल्यामुळे कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता अदा करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. **पंचायती राज समितीच्या शिफारशीनुसार**

**ग्रामीण पातळीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मुख्यालयी राहण्याची आवश्यकता आहे, या बाबी विचारात घेऊन वित्त विभागाच्या मान्यतेने आवश्यक तो निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व रहिवासाचा दाखला निश्चित कोणामार्फत व कसा घ्यावा याबाबत आवश्यक त्या सूचना त्वरीत देण्यात याव्यात याकरीता ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### भारत निर्माण योजनेचे काम अपुर्ण असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हयातील वेल्हे पंचायत समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत आहेत काय, त्यासंदर्भात सद्यस्थिती काय आहे, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पाणी पुरवठ्यासबंधीचे काम पाहण्यासाठी स्वतंत्र अधिकारी आहेत. यावर्षी सन २०१४-१५ करिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल आराखड्यामध्ये २७ हॅबीटेशन्स टार्गेट दिले. होते त्यापैकी १७ योजनांना मंजूरी मिळालेली आहे. तसेच, १० प्रस्ताव लोकसंख्येच्या निकषामध्ये बसत नसल्यामुळे रद्द करण्यात आले आहेत.

समितीने आणखी विचारणा केली की, पाणी पुरवठ्याच्या जुन्या काही योजना रखडलेल्या आहेत काय, यावर उप अभियंता ग्रामिण पाणी पूरवठा यांनी स्पष्ट केले की, खाटपेवाडी पाणी पुरवठा योजना अर्धवट आहे. सदर योजना पूर्ण होण्याकरिता थोडासा निधी कमी आहे. सदर योजनेच्या टाकीच्या स्लॅबचे काम पूर्ण झालेले नाही. योजनेचा खर्च पूर्ण झालेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदर योजना किती लाखांची आहे, किती पैसे शिल्लक आहेत, यावर उप अभियंता पाणी पूरवठा यांनी खुलासा केला की, सदरचे काम ५ लाख ९१ हजार रुपयांचे आहे. यावर उप अभियंता यांचे म्हणने खोडून शाखा अभियंता यांनी स्पष्ट केले की, सदर कामाचे इस्टिमेट १४.६१ लाख रुपयांचे आहे. यावर समितीने आश्चर्य व्यक्त केले की, सदर काम १४.६१ लाखांचे असून ५ लाख ९१ हजार रुपयांमध्ये ठेकेदाराने ९० टक्के काम कसे पूर्ण केले. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता कधी देण्यात आली, काम करणारा ठेकेदार कोण आहे, यावर उप अभियंता यांनी समितीस विदित केले की, सदर काम करणाऱ्या ठेकेदाराचे नाव श्री.यु.एस. नलावडे असून सदर काम भारत निर्माण योजना अतंर्गत आहे. समितीने निदेश दिले की, सदर ठेकेदार विहीत कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसेल तर त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे व गट विकास अधिकारी यांनी सदर प्रकरणी लक्ष घालून काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

भारत निर्माण योजनेत १४.६१ लक्ष रुपयांचे काम असतांना केवळ ५ लक्ष ९१ हजार रुपयांमध्ये योजनेचे ९०% काम पूर्ण करणाऱ्या श्री.यु.एस. नलावडे या ठेकेदारावर विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसल्यामुळे काळया यादी मध्ये टाकण्याबाबत समितीने निदेशीत केलेले आहेत, त्यानुसार कोणती कारवाई केली आहे?

**चौकशी समितीचा अहवाल**

भारत निर्माण कार्यक्रम योजनेअंतर्गत सन २००८-२००९ मध्ये खाटपेवाडी ता. वेल्हे गावासाठी पाणी पुरवठा योजना मंजुर करण्यात आली आहे. सदरकाम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने श्री.यु.एस.नलावडे यांना दिलेले आहे.

योजनेमध्ये अस्तित्वात असलेले विहिरीचे खोलीकरण, पंपिग मशिनरी-५ अश्वशक्ती २ नग, दाबनलिका ६५ मी.मी. जी.आय पाईप ७४० मी.२००० लिटर्स क्षमतेची जमिनीवरील टाकी व ११०० मी .वितरण व्यवस्था इ. बाबीचा समावेश आहे. त्यापैकी विहिर खोलकरणे व दाबनलिकेचे काम पुर्ण झाले आहे. जमिनीवरील टाकीचे काम स्लॅब लेव्हल पर्यत झालेले आहे. व्यवस्थेचे पाईप उपलब्ध झालेले आहे. टाकीच्या कामाच्या जागेबाबत हरकत घेतल्याने पुढील काम हावू शकलेले नाही. सदर काम लवकरात लवकर पुर्ण करणेसाठी समितीकडे वारंवार पाठपुरावा करणेत येत होता. त्यानुसार दिनांक १२.०५.२०१५ रोजी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने दिलेल्या पत्रानुसार टाकीच्या जागेचा वाद मिटला आहे. त्यानुसार उपअभियंता, जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र दि. १९.०५.२०१५ अन्वये सदर योजनेचे काम डिसेंबर २०१५ पर्यंत पुर्ण करणेबाबत ठेकेदार श्री.यु.एस.नलावडे यांना कळविले आहे. सदर कामासाठी र. रु. ५.९१ लक्ष पहिला हप्ता वितरीत केला आहे. तथापि जागेचा वाद असल्यामुळे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने दुसऱ्या हप्त्याची मागणी केलेली नाही. सदरच्या दुसऱ्या हप्त्याच्या मागणीच्या प्रस्तावाची पुर्तता करुन घेत आहे. जागेच्या वादामुळे सदर कामास विलंब झाला आहे. यामध्ये ठेकेदार दोषी नसलेने काळया यादीमध्ये टाकलेले नाही. सध्या सदर काम सुरु केले असून डिसेंबर, २०१५ पर्यंत पुर्ण करणेत येणार आहे.

तसेच जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र दि. १९.०८.२०१५ अन्वये संबंधित ठेकेदारास काम पुर्ण न केल्यास निविदा शर्त ३-क नियमाखाली काम काढून घेणेबाबत नोटीस देण्यात आली असून संबंधितांचे नाव काळया यादीत टाकणेबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल असे सुचित केलेले आहे. तदअनुषंगाने संबंधित ठेकेदार

यांनी दिनांक २६.०८.२०१५ रोजी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये माहे डिसेंबर, २०१५ अखेर काम पुर्ण करणार असल्याबाबत कळविलेले आहे.

संबंधित ठेकेदाराने सदरचे काम डिसेंबर, २०१५ अखेर पुर्ण न केल्यास संबंधित ठेकेदारावर उपरोक्त प्रमाणे सुचित केलेली कारवाई करण्यात येईल.

निष्कर्ष

सदरचे काम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत ठेकादार नेमुण करण्यात येत आहे. सदर ठिकाणी टाकीच्या जागेबाबत हरकत असल्याचे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नमुद केले आहे व आता वाद मिटला असुन पावसाळा संपताच काम सुरु करता येईल असे समितीने उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, वेल्हा यांना दिनांक १२.०५.२०१५ मध्ये कळविले आहे. ठेकेदाराने पण काम डिसेंबर, २०१५ पर्यंत पुर्ण करण्याचे मान्य केले आहे. काम पुर्ण होण्याचे दृष्टीने ठेकेदारास काम पुर्ण करण्यास डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदत देवून त्यानंतर काम पुर्ण न केल्यास निविदे मधील शर्त ३ (क) खालील कार्यवाही करुन ठेकेदारास काळया यादीत टाकणे योग्य होईल असे मत आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरचे काम लवकारात लवकर पुर्ण करणेसाठी उप अभियंता उपविभाग वेल्हे यांनी वारंवार पाठपुरावा केलेला असून त्या अनुषंगाने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या दिनांक १२.०५.२०१५ च्या पत्रानुसार सदर जागेचा वाद मिटल्याचे कळविले असून जानेवारी, २०१६ पर्यंत  काम पुर्ण करण्यात येईल. तसे ठेकेदार श्री.यु.एस. नलावडे यांना कळविले आहे. उपविभागाने दि.१९.०५.२०१५ नुसार सदर योजनेचे काम डिसेंबर -२०१५ पर्यंत पुर्ण करणेबाबत ठेकेदारास पत्र दिलेले आहे. त्यानुसार ठेकेदाराने उर्वरित काम सुरु केलेले असून डिसेंबर-२०१५ पर्यंत सदरचे काम पुर्ण केलेले असून डिसेंबर,२०१५ पर्यंत सदरचे काम पुर्ण करण्यात येईल असे उपविभागास कळविलेले आहे. सबब ठेकेदारास काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी तयार केलेला नसून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जाक्र/ग्रापापु/वशी/५२७/१५ दिनांक -२७/१०/२०१५ अन्वये कळविले आहे.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून माहिता प्राप्त झाली.**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही. प्रधान सचिव, ग्राम विकास यांच्या दि. २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित

केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.

**<u>पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.</u>**

पंचायती राज समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पंचायत समिती, वेल्हा येथे भेट देवून गट विकास अधिकारी यांनी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीला खाटपेवाडी पाणी पुरवठा योजना अर्धवट असल्याची महिती मिळाली. योजनेच ठेकेदार यांनी योजना विहित कालावधीत पूर्ण केली नसल्यामुळे त्यांस काळया यादीत टाकावे व सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल समितीस पाठविण्यात यावा असे निदेश समितीने दिले. समितीने भारत निर्माण योजनेत १४.६१ लक्ष रुपयांचे काम असतांना केवळ ५ लक्ष ९१ हजार रुपयांमध्ये योजनेचे ९०% काम पूर्ण करणाऱ्या श्री.यु.एस. नलावडे या ठेकेदारावर विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसल्यामुळे काळया यादी मध्ये टाकण्याबाबत समितीने निदेशीत केलेले आहे.

समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने चौकशी करुन अहवाल समितीस सादर केला. सदरहू योजनेच्या कामात टाकीच्या कामाबाबत वाद उत्पन्न झाल्यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण होवू शकलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यात आलेले नाही. परंतु त्यांनी डिसेंबर अखेर वाढीव मुदतीत काम पूर्ण केले नाही तर त्यास काळया यादीत टाकण्यात येइल अशी माहिती समितीला देण्यात आली. समिती सदस्यांना योजनेचे काम पूर्ण होवून पाणी पूरवठा सुरु झाल्याची माहिती होती परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ती नव्हती किंवा त्यांच्या गट विकास अधिकारी यांना माहिती नव्हती याबाबत समितीने तिव्र नाराजी व्यक्त केली.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सदरची योजना ही सन २००८-०९ या कालावधीतील असुन सन २०१५ पर्यंत देखील पूर्ण करण्यात आली नाही. या प्रकरणी चौकशी अहवाल समाधानकारक नाही. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे स्वत: प्रकल्पस्थळी जाऊन पहाणी करावी आणि तद्नंतर या प्रकरणी दोषीतांवर यापूर्वीच कठोर प्रशासकीय तसेच दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक होते परंतु तसे देखील चौकशीत अधिका-यांनी सुचविले नाही त्यामुळे एकंदरीत या योजनेतील दोषी अधिका-यांना जिल्हा परिषद

पाठीशी घालत असल्याचा संशय समितीस येतो व पाठविलेल्या चौकशी अहवालावर जिल्हा परिषदेने कारवाई करुन या प्रकरणी पुन्हा चौकशी करुन दोषीतांवर त्वरीत कठोर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करुन ती तीन महिन्यात निकाली काढावी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठवावी, अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मौजे खाटपेवाडी (पाल बु), ता. वेल्हा नळ पाणी पुरवठा योजनेची अंदाज पत्रकीय रक्कम रु. १४.६१ लक्ष एवढी आहे. या कामासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला प्रथम हप्त्याची रक्कम रु. ५.९१ लक्ष माहे मार्च, २००८ मध्ये वर्ग करण्यात आली होती. तथापि सदर ठिकाणी जागेचा वाद निर्माण झाल्याने पुढील काम होऊ शकले नाही. तथापि वाद मिटल्यावर माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये सर्व काम पुर्ण करुन योजने दवारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. सदर योजनेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १५.०७.२०१६ रोजी भेट देवून पाहणी केली असता पाणी पुरवठा सुरळीत चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर योजनेचे काम दिनांक १९.१०.२०१५ रोजी पुर्ण झालेले असुन ग्रामपंचायत खाटपेवाडी यांना दि २०.११.२०१५ रोजी हस्तांतरण करणेत आलेली आहे. तसेच ग्रामपंचायत खाटपेवाडी यांनी सदर योजनेच्या दुसऱ्या व अंतिम हप्त्याची मागणी केलेली असुन रू ३.८६ लक्ष ग्रामपंचायत मार्फ़त समितीस वर्ग करण्यात आले आहे.

सदर योजनेचे संबंधित ठेकेदार श्री यु एस नलावडे पुणे यांचे नाव काळया यादीत समावेश करणेबाबत या कार्यालयाकडील पत्र जा .क्र जिप/ग्रापापु/लेखा ३८१/१७ दि १०.७.२०१७ अन्वये अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

तसेच सदर योजनेस विलंब झाल्याने त्यास जबाबदार असणारे अधिकारी श्री .व्ही. एम. तंवर, तत्कालीन कार्यकारी अभियंता (से.नि), श्री. डि. एन. कुलकर्णी, तत्कालीन कार्यकारी अभियंता (से.नि), श्री. एस. आर. गायकवाड .तत्कालीन उप अभियंता, श्री. आर. पी. कोळी, तत्कालीन उप अभियंता, श्री. ए. व्ही. जाधव, तत्कालीन उप अभियंता, (से. नि), श्री.ए. बी. पवार, तत्कालीन शाखा अभियंता व श्री. ए. एन. शेलार, शाखा अभियंता यांना या कार्यालयाकडील नोटीस जा.क्र/जिप/ग्रापापु/आस्था/३८२/१७ दि १०.७.२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविणेत आला होता. तद् अनुषंगाने सदरचे खुलासे विचारात घेता श्री. व्हि. एम. तंवर, तत्कालीन कार्यकारी अभियंता (से.नि.), श्री. डि. एन. कुलकर्णी, तत्कालीन कार्यकारी अभियंता (से.नि.) हे पर्यवेक्षकीय जबाबदारीस प्रत्यक्षात जबाबदार नाहीत.

असा निष्कर्ष तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढलेला आहे.सदयस्थितीत योजना पुर्ण झाली असुन पाणी पुरवठा व्यवस्थित सुरु असल्याने झालेल्या विलंबा बाबत श्री. एस. आर. गायकवाड, तत्कालीन उपअभियंता, श्री. आर. पी. कोळी, तत्कालीन उपअभियंता यांचे खुलासे विचारात घेता सदर उपअभियंता व श्री. ए. एन. शेलार, शाखा अभियंता यांचे विरुध्द कारवाईचा प्रस्ताव मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिप/ग्रापापु/ आस्था/३४३/२०१७, दिनांक ०५.१२.२०१७ रोजी सादर करणेत आला आहे.

त्या अनुषंगाने मा.मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील पत्र क्र प्रविभाचौ२१/२०१७/जिपपुणे/आ-२ दि ०५/१/२०१८ अन्वये श्री आर पी कोळी तत्कालीन उपअभियंता, श्री.एस.आर गायकवाड, तत्कालीन उपअभियंता व श्री. ए .एन. शेलार, शाखा अभियंता हे तिन्ही अधिकारी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि. प. पुणे येथेच कार्यरत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील १४(१) व १४(२) (एक) मधील तरतुदींनुसार किरकोळ शिक्षेबाबत कार्यवाही करणेकरीता शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे अधिकार असल्याने त्यांचेविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरच करण्यात यावी असे कळविणेत आले होते. त्यानुसार याकार्यालयाकडील आदेश क्र जिप/ग्रापापु/आस्था/२०३/२०१८दि १०.४.१८अन्वये श्री आर पी कोळी तत्कालीन उपअभियंता व श्री एस आर गायकवाड तत्कालीन उपअभियंता यांना ठपका ठेवणे ही शास्ती करण्यात आली असून सदरची नोंद त्यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत आलेली आहे. तसेच आदेश क्र.जिप/ग्रापापु/ आस्था/२०५/२०१८ दि. १०.४.२०१८ अन्वये श्री. ए. एन. शेलार, शाखा अभियंता यांची माहे जुलै, २०१८ ची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात पुढील वेतनवाढीवर परिणाम न ठेवता रोखून ठेवणेची शास्ती करण्यात आलेली आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** अप्राप्त

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने

सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय अप्राप्त कसे काय आहेत. वेळच्या वेळी समितीला माहिती का दिली नाही.

यावर, सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भातील सर्व माहिती तयार करण्यात आली आहे. आपली परवानगी घेऊन माहिती देण्यात येणार होती. समितीला वेळच्या वेळी माहिती देण्यात येईल, यापुढे असे होणार नाही. तशा प्रकारचे आश्वासन मी समितीला देत आहे. यापुढे माहिती देण्यात उशीर होणार नाही.

यावर, समितीने असे निदेश दिले की, आपण विभागाचे सचिव आहात, आपण अपडेट राहणे आवश्यक आहे, आपण अपडेट नसाल तर प्रशासनावर आपला वचक राहणार नाही. आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी आपणाला वेळीच सर्व माहिती तयार करुन देणे अपेक्षित आहे. माहिती देण्यामध्ये ज्या अधिकाऱ्यांची हलगर्जीपणा केला त्यांच्यावर आपण कारवाई करावी. यापुढे असे होणार नाही याची दक्षता बाळगावी व या विषयाबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक दोन च्या अनुषंगाने समितीने पुर्ण जिल्हयातील व्ल्हे पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांची साक्ष घेतली या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सदर योजनेच्या टाकीचे स्लॅबचे काम पूर्ण झालेले नाही योजनेचा खर्च पूर्ण झालेला आहे. सदर काम ५ लाख ९१ हजार रुपयांचे होते यावर उपअभियंता यांनी स्पष्ट केले की सदर कामाचे एकूण अंदाजपत्रक १४.६१ लाख रुपयांचे आहे. असे असताना रु. ५ लाख ९१ हजारामध्ये ठेकेदाराने ९० टक्के काम पूर्ण केले आहे याचे समितीस आश्चर्य वाटते.

सदर काम भारत निर्माण योजनेंतर्गत असून योजनेच्या ठेकेदाराचे नाव श्री. यु. एस. नलावडे आहे. विहित कालावधीमध्ये काम पूर्ण न केल्या प्रकरणी ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यात यावे असे समितीने निदेश दिले. याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये असे आढळून आले की जमिनीवरील टाकीचे काम स्लॅबलेव्हल पर्यंत झालेले आहे टाकीच्या कामाच्या जागेबाबत हरकत घेतल्याने पुढील काम होऊ शकले नाही. जिल्हा परिषद

कार्यालयाकडील पत्र दि. १९.०८.२०१५ अन्वये संबंधित ठेकेदारास काम पूर्ण न केल्यास निविदा शर्त-३ क नियमाखाली काम काढून घेणेबाबत नोटीस देण्यात आली असून ठेकेदाराचे नांव काळया यादीत टाकणेबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. तदनुषंगाने १३ डिसेंबर २०१५ अखेर काम करण्यात येईल असे ठेकेदाराने कळविले व त्यानुसार ठेकेदाराने १३ डिसेंबर २०१५ पर्यंत योजनेचे काम पूर्ण केलेले आहे त्यामुळे ठेकेदारास काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांनी तयार केला नाही.

सदर योजना सन २००८-०९ या कालावधीतील असूनसन २०१५ पर्यंत देखील योजनेचे काम पूर्ण करण्यात आले नाही. याप्रकरणी सादर करण्यात आलेला चौकशी अहवाल समाधानकारक नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे स्वत: प्रकल्पस्थळी जाऊन कामाची पाहणी करावी तद्नंतर दोषीतांवर कठोर प्रशासकीय दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक होते. त्याप्रमाणे चोकशी अधिकाऱ्यांनी सुचविले नाही. या प्रकरणी पुन्हा चौकशी करुन दोषीतांवर कठोर शासकीय कारवाई प्रस्तावित करुन ३ महिन्यात निकाली काढावी अशी समितीने शिफारस केलेली होती.

शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद पुणे यांना पुढीलप्रमाणे लेखी माहिती पाठविली आहे त्यामुध्ये असे नमूद करण्यात आले आहे सदर योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १५.०७.२०१६ रोजी भेट देऊन पाहणी केली असता पाणी पुरवठा सुरळीत चाजू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर योजनेचे संबंधित ठेकेदार याचे नाव काळया यादीत समावेश करणेबाबत दि. १० जुलै २०१७ रोजी अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांना कळविण्यात आले आहे.

**तसेच सदर योजनेस विलंब झाल्या प्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. व्ही. एम. नंवर (सेवानिवृत्त), श्री. डी. एन. कुलकर्णी (सेवानिवृत्त) तसेच तत्कालीन उप अभियंता श्री. आर. पी. कोळी, श्री. ए.व्ही. जाधव (सेवानिवृत्त), शाखा अभियंता श्री. ए. बी. पवार, श्री. ए. एन.शेलार यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविला आहे. खुलासे विचारात घेता श्री. नंवर व श्री. कुलकर्णी हे पर्यवेक्षकीय जबाबदारीस प्रत्यक्षात जबाबदार नाहीत असा निष्कर्ष मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निष्कर्ष काढलेला आहे. सद्द:स्थितीत योजना पूर्ण झाली असून पाणीपुरवठा व्यवस्थित सुरु असल्याने विलंबाबात श्री. एम. आर. गायकवाड, तत्कालीन उपअभियंता श्री. आर. पी. कोळी तत्कालीन उपअभियंता यांचे खुलासे विचारात**

घेता सदर उपअभियंता व श्री. ए. एन. शेलार शाखा अभियंता यांचे विरुध्द कारवाईचा प्रस्ताव मुख्य प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे दि. ५.१२.२०१७ रोजी सादर केलेला होता. त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात यावी असे कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री. कोळी व गायकवाड या दोन तत्कालीन अभियंत्यांवर ठपका ठेवणे ही शास्ती करण्यात आलेली असून त्यांचे सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. तसेच श्री. शेलार शाखा अभियंता यांची जुलै २०१८ चा एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता रोखून ठेवण्याची शास्ती केलेली आहे या कार्यवाही प्रकरणी समिती  समाधान व्यक्त करते.

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

## नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमितता

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. समितीने जुन्नर तालुक्यातील नारायणगांव ग्रामपंचयतीला भेट दिली. त्यावेळी आढळून आलेल्या काही बाबींवर समितीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रश्नावली क्रमांक एक वरील समितीने विचारणा केली केली की, जुन्नर तालुक्यातील नारायणगांव हे मोठे गाव आहे. या गावाच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये वारंवार विषय चर्चेला आला होता. मला वाटते जी बाब चुकीची असेल ती चुकीची असल्याचे सांगून जिल्हा परिषदेने आपले कर्तव्य पार पाडावे. त्यामुळे त्या गावातील वस्तुस्थिती बघावी आणि तीन महिन्यात तेथील प्रकार थांबवावा. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नारायणगांव येथील दोन प्रकरणे आर्थिक अनियमिततेची आणि एक प्रकरण जागेच्या बाबतीत आहे. ही प्रकरणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आणि स्थायी सभेत सुध्दा उपस्थित करण्यात आली होती. या अनुषंगाने सांगू इच्छितो की, जागेच्या बाबतीत रेकॉर्ड ऑफ राईटस्‌वर मालकी हक्क नेमका कोणाचा आहे या बाबतीत कोर्ट मॅटर झालेले आहे. त्यामुळे या जागेचा मालकी हक्क सिध्द करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे. तसेच आर्थिक अनियमिततेच्या बाबतीत तेथील विशेष लेखा परीक्षण करण्यासंदर्भात स्थानिक लेखा परीक्षकांना एक महिन्यापूर्वी पत्र पाठविलेले आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर आम्हाला डिटेल्समध्ये जाता येईल. समितीच्या मते स्पेसिफिक याविषयाचे लेखा परीक्षण करण्यासाठी जास्त वेळ लागणार नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वस्त केले की, पंचायती राज समितीच्या बैठकीमध्ये सदरहू विषयावर चर्चा झाल्यामुळे या बाबीचे विशेष लेखा परीक्षण लवकरात लवकर करण्याबाबत स्थानिक लेखा परीक्षकांना सांगण्यात येईल. या बाबतीत त्यांना पत्र सुध्दा देण्यात येईल.

**उपरोक्त मुद्दयाबाबत समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण तातडीने करुन घेण्यात येईल असे आश्वासीत केले आहे त्यानुसार केलेल्या लेखा परिक्षण अहवालात काय आढळून आले आहेत ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामपंचायत नाराणगांव ता. जुन्नर येथील ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत उपमुख्य लेखा परिक्षक(वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा कार्यालय, पुणे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ पंचा/९/३९२/२०१२ दि.४/४/१२ नूसार कळविण्यांत आलेले होते.

तथापि विशेष लेखा परिक्षण न झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पत्र जा.कर.जिप/पंचा/आस्था-८/१८४/१५ दि.५/३/१५ नुसार मा.संचालक, स्थानिक निधी लेख परिक्षा संचालनालय महाराष्ट्र राज्य कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई यांना  लेखा परिक्षण करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच या कर्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/पंचा/९/३५४/२०१५ दि.२८/०४/२०१५ नुसार ग्रामपंचायत नाराणगांव येथील प्राथमिक चौकशी अहवाल पाठविण्यांत आलेला आहे.

तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील अ.श.पत्र जा.क्र.जिप/पंचा/आस्था-८/१४६९/ २०१५ नूसार दि.२/११/२०१५ नुसार ग्रामपंचायत नाराणगांव येथील विशेष लेखा परिक्षण करणेबाबत कळविलेले आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या दि.२३ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करून त्याबातचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देणेत आलेल्या आहेत. असे समितीस कळविले.

**चौकशी अहवाल**

ग्रामपंचायत नाराणगांव ता. जुन्नर येथील ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत उपमुख्य लेखा परिक्षक(वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा कार्यालय, पुणे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ पंचा/९/३९२/२०१२ दि.४/४/१२ नूसार कळविण्यांत आलेले होते.

**पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. समितीने जुन्नर तालुक्यातील नारायणगांव ग्रामपंचयतीला भेट दिली. त्यावेळी आढळून आलेल्या अधिक अनियमिततेच्या बाबतीत चौकशी करुन स्थानिक निधी लेखा परिक्षकाडून विशेष लेखा परिक्षण करण्यासंदर्भात समितीने निदेश दिले. विभागीय सचिवांच्या साक्षी करीता समितीने नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण तातडीने करुन घेण्यात येईल असे आश्वासीत केले आहे त्यानुसार केलेल्या लेखा परिक्षण अहवालात काय आढळून आले आहेत, अशी विचारणा केली. समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने नारायणगाव ग्रामपंचायतीची चौकशी करुन दोन खंडामध्ये बृहद अहवाल समितीस सादर केला.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, मार्च, २०१५ मध्ये आपल्याकडून आमच्याकडे विशेष लेखापरीक्षणाबाबतचा प्रस्ताव आला होता. १९९५ च्या शासन निर्णयानुसार विशेष लेखापरीक्षणाचा नियम असा आहे की, प्राथमिक चौकशी अहवाल मूळ स्तरावरून होऊन त्याचा अहवाल विशेष लेखापरीलक्षण विभागाकडे विहित प्रपत्रात नमूद करुन पाठविणे आवश्यक आहे. तसेच, लेखापरीक्षणाविषयी सर्व माहिती देखील लेखापरीक्षण विभागाकडे सुपूर्द होणे आवश्यक आहे. सदरहू लेखा परिक्षण बाबतचा प्राथमीक चौकशी अहवाल संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना प्राप्त झाल्या शिवाय ते विशेष लेखा परिक्षण करु शकत नाहीत तरी जिल्हा परिषद, पुणे यांनी साक्षीच्या वेळी मान्य केल्या प्रमाणे ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत विहित प्रपत्रामध्ये लेखा परिक्षणाबाबतची प्राथमीक चौकशी अहवालातील माहिती पाठवावी व तीन महिन्याच्या आत विशेष लेखापरिक्षण करुन त्याचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

ग्रामपंचायत नारायणगाव ता. जुन्नरजि पुणे येथील सन २००८ ते २०१३ चे विशेष लेखा परिक्षण करणेसाठीचा प्रस्ताव दिनांक १९ जुन, १९९५ च्या जोडपत्रानुसार या कार्यालयाकडून दिनांक ९.१२.२०१५ रोजी मा. संचालक, स्थानिक निधी लेखा मुंबई यांना पाठविण्यात आला आहे. .

तसेच मा. संचालक, स्थानिक निधी लेखा मुंबईयांना खालीलप्रमाणे वेळोवेळी पत्रान्वये विनंतीकरणेत आलेली आहे.

१) दिनांक १०.५.२०१६

२) दिनांक १८.११.२०१६

३) दिनांक ८.२.२०१७

४) दिनांक २९.४.२०१७

५) अ शा पत्र दि १०.१.२०१८

तथापि मा. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षण मुंबई यांचेकडुन विशेष लेखा परिक्षणा बाबत कार्यवाही सुरू झालेली नाही.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**ग्रामविकास विभाग (वित्त ४) :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील तरतुदींनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेष लेखा परिक्षणास मंजूरी देण्याचे अधिकार संचालक, स्थानिक निधी लेखा यांना आहेत. जिल्हा परिषद, पुणे यांनी या विषयी संचालक स्थानिक निधी लेखा यांचेकडे पाठपुरावा केलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने

सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी जिल्हा परिषदेने कारवाई केली आहे. एका प्रकरणातील कार्यवाही राहिलेली आहे. समितीने विशेष लेखापरीक्षण करण्याचे सूचित केले होते. त्याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांना विनंती करण्यात आली होती. यापूर्वीच्या ४-५ प्रकरणांमध्ये प्रथम कॅफो यांनी लेखापरीक्षण केले आहे त्यानुसार उक्त प्रकरणी कॅफो यांचेकडून लेखापरीक्षण करण्याचे माहे मार्च मध्ये कळविण्यात आले आहे. स्थानिक निधी लेखा कार्यालयातील लेखापरीक्षकांकडे कामाचा व्याप अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी अडचण आली आहे. तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, स्थानिक निधी लेखा कार्यालयाचे लेखापरीक्षक यांना दोन वेळा लेखापरीक्षणासाठी आले असता अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी पत्र देऊन ऑडिट करण्याबाबत सांगतात. परंतु त्यांच्याकडे रेकॉर्ड आहे की नाही, हे ते पाहत नाहीत. त्यामुळे पंचायती राज समितीचे निदेश असतानाही आम्ही ऑडिट करीत नाही, असे होते. आमच्यावर असा ब्लेम येत असतो. त्यामुळे मी विनंती करतो की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रेकॉर्ड उपलब्ध आहे की नाही, या संदर्भात खात्री करावी आणि मग आम्हाला ऑडिट करण्याबाबत विनंती करावी.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लेखापरीक्षण करुन त्याचा अहवाल स्थानिक निधी लेखा यांना पाठविण्याबाबतचा मुद्दा प्रलंबित आहे. सदरहू प्रकरणी सर्व कागदपत्रे जमा करुन ती स्थानिक निधी लेखा यांना पाठवावी लागणार आहेत. त्यासाठी २ महिन्यांची मुदत पुरेशी आहे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांचे म्हणणे बरोबर आहे, जर असे असेल तर, विभागाचीही त्यामध्ये चूक आहे. जेव्हा पंचायती राज समिती स्पेशल ऑडिटचे निदेश देईल, तेव्हा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खात्री करुन संपूर्ण रेकॉर्डसह प्रस्ताव पाठवावा असे परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

यावर समितीने असे निदेश दिले की, या संदर्भात लवकरात लवकर प्रक्रिया करण्यात यावी. सदर विषयाच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संपूर्ण तपासणी करुन तसा अहवाल एका महिन्यात सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळेस समितीने दिनांक १३ ऑगस्ट २०१५ रोजी जुन्नर तालुक्यातील नारायणगाव ग्रामपंचायतीला भेट दिली असता दोन प्रकरणे आर्थिक अनियमिततेची आणि एक प्रकरण जागेच्या बाबतीत समितीने प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जागेचा मालकी हक्क सिध्द करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे. आर्थिक अनियमिततेच्या बाबतीत येथील विशेष लेखा परिक्षण करण्या संदर्भात स्थानिक निधी लेखा परिक्षकांना कळविण्यात आल्याचे समितीस आश्वस्त केले. याबाबात प्रधान सचिव, ग्राम विकास यांनी दिनांक २३ ऑक्टोंबर २०१५ रोजीच्या अर्धशासकीस पत्राव्दारे समितीने निर्देशित केल्या नुसार जिल्हापरिदेने नारायण गाव ग्रामपंचायतीची चौकशी करुन दोन खंडामध्ये बृहत अहवाल समितीस सादर करण्यात आला आहे.

पंचायत राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चवथा अहवाल सभागृहास दिनांक २१ डिसेंबर २०१५ रोजी सादर केला. त्यावेळेस समितीने सूचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय समितीची साक्ष घेतली होती. सदरहु साक्षीत सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जिल्हा परिषदेने एका प्रकरणाची कार्यवाही राहिलेली आहे यापुर्वीच्या ४-५ प्रकरणांमध्ये प्रथम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी लेखापरिक्षण करुन माहे मार्च मध्ये कळविले असता लेखापरिक्षकांकडे कामाचा व्याप अधिक प्रमाणात असल्यामुळे प्रलंबित राहिल्याचे त्यांनी समितीस माहिती विशद केली. याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक यांनी दोन वेळा लेखापरिक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आला नाही असा आक्षेप त्यांनी घेतला. याबाबत सदरहु प्रकरणे सर्व कागदपत्रे जमा करुन ती संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक यांच्याकडे दोन महिन्याच्या मुदतीत पाठविण्यात येतील असे निर्देश त्यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना दिले.

**याबाबत लवकरात लवकर सर्व प्रक्रिया पुर्ण कराव्यात असे निर्देश समितीने दिले असता, आम्हाला लेखा परिक्षण करायचे नाही फक्त कागदपत्रे गोळा करावयाचे आहेत आणि ती कागदपत्रे मिळत नसतील तर त्याबाबतचे तसे प्रमाणपत्र देवून त्यांच्याकडे कागदपत्रे पाठविण्यात येतील असे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले असता सदर विषयाच्या बाबतीत संपुर्ण तपासणी करुन तसा**

अहवाल समितीस सादर करण्यात यावा असे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीने दिले होते. सबब, याप्रकरणी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे कारवाई करावी व त्वरेने प्रलंबित कामे पूर्ण करावीत अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करणेबाबत

पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने उपरोक्त मुद्यासंदर्भात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी आपला चौथा अहवाल सादर करुन पुढील प्रमाणे शिफारशी केल्या.

१) समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असताना विशेषत: पुणे जिल्हा परिषदेत गैंरव्यवहार व अपहाराच्या मोठमोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत.या प्रकरणी समिती अशी शिफ़ारस करते की जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैंरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या व्यवहारा संदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपत्र दाखल करून असे प्रकरण ६ महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैंरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरूध्द ती जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी अशी समितीची शिफ़ारस आहे.

२) एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.उपरोक्त बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही शिफ़ारस आहे.

३) गैंरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून पुणे जिल्हा परिषदेतील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात

एकूण किती रकमेची शासन खाती वसूली केली या बाबींची माहिती समितीला कळविण्यात यावी अशीही समितीची शिफ़ारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

१) समितीने केलेल्या शिफ़ारशीनुसार प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फ़त संबंधित जबाबदार कर्मचारी/ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटिस बजावल्या होत्या.

जिल्हा परिषद पुणे अंतर्गत एकूण ५०९ प्रकरणांपैकी ३१६ प्रकरणे हे संशयीत अपहाराची आणि १९३ प्रकरणे लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध न करून दिलेची होती. वरील ३१६ प्रकरणांमध्ये रू.७,५५,३२१८२ /- इतकी रक्कम गुंतलेली होती. दि.२३ जुलै, २०१५ अखेर त्यापैकी रू. २,०७,९३,०३४/- इतकी रक्कम वसूल /समायोजित झालेली होती. मार्च, २०१८ अखेर वसूल /समायोजित रू. ३,८९,२१,००३/- इतकी आहे.

वरील प्रलंबित प्रकरणांमध्ये ५७ कर्मचारी दोषी आढळून आलेले होते .त्यापैकी ७ कर्मचा-यांना बडतर्फ़ करण्यात आले आहे, ८ कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे. १ कर्मचा-याला सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे.५ कर्मचा-यांच्या सेवा निवृत्तीवेतनात कपात करण्यात आली आहे.१३ कर्मचा-यांना मूळ वेतनावर आणण्यात आले आहे. १ कर्मचा-यावर ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच ३ कर्मचा-यांवर निलंबीत करण्यात आले आहे आणि १ कर्मचा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वर नमूद केलेल्या ५०९ प्रकरणांपैकी १९३प्रकरणे ही लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध न करून देणेची होती. त्यापैकी ८३ प्रकरणां मधील दप्तरे उपलब्ध झालेली आहेत आणि त्यांचे लेखा परिक्षण करून घेणे बाबत सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा पुणे यांना पत्र देण्यात आलेली आहेत.

सदर १९३ प्रकरणांमधील ११८ ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी जबाबदार होते. त्यापैकी २८ ग्रामसेवक सेवा निवृत्त आहेत. १० ग्रामसेवकांना बडतर्फ़ करण्यात आले आहे.४ ग्रामसेवकांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. ३ ग्रामसेवकांच्या सेवानिवृत्ती वेतनात कपात करण्यात आली आहे. २ ग्रामसेवकास सेवेतून कमी करण्यात आले आहे. १ ग्रामसेवकाची वेतनवाढ बंद करण्यात आली आहे आणि ४६ ग्रामसेवकांकडून शासन निर्देशाप्रमाणे रू १००/-

प्रमाणे रू. १०,९००/- दंड वसूल करण्यात आला आहे आणि २३ ग्रामसेवक मयत आहेत.सदरची सर्व प्रकरणे सन २०११ पूर्वीची आहेत.

समितीने केलेल्या शिफ़ारशी प्रमाणे उपरोक्त नमूद केलेनुसार फ़क्त दोषी कर्मचा-यांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. मयत आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना अपहारित रक्कमांची वसूली आणि समायोजन प्रक्रीयेतून वगळण्यात आले आहे. तसेच निर्दोष व्यक्तींना शिक्षा होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

२) शासनाने परिपत्रक क्र मविसे २०१६/प्रक्र ९८/आस्था-२ दि. ०२ जानेवारी २०१७ अन्वये कार्यवाही सुरू आहे.

३) गैरव्यवहार प्रकरणांमध्ये गुतलेल्या एकूण रू ७,५५,३२,१८२ पैकी रू २,०७,९३,०३४ समायोजित/वसूल झालेली असून उर्वरित रू ५,४७,३९,१४८ ची पुर्तता करणेची कारवाई सुरू आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**ग्रामविकास विभाग (वित्त -९) :- १)** जिल्हा परिषदेच्या खुलाश्यास सहमती दर्शविण्यात येत आहे.

**ग्रामविकास विभाग (आस्था-२) :-** २) समितीच्या शिफ़ारशीनुसार शासनाने परिपत्रक क्र मविसे २०१६/प्रक्र ९८/आस्था-२ दि. ०२ जानेवारी २०१७ अन्वये सर्व संबंधितांना सूचना दिल्या आहेत. परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. (पृष्ठ क्रं. ६३)

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चौथा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, गैरव्यवहाराच्या व अखर्चित रकमा जमा झालेल्या नाहीत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, गैरव्यवहार प्रकरणातील काही रक्कम जमा झाली आहे. गैरव्यवहारामध्ये ७ कोटी ५५ लक्ष रुपये गुंतले होते. त्यापैकी ३ कोटी ८९ लक्ष रुपये वसूल झाली असून ३ कोटी ७० लक्ष रुपये वसुलीची कार्यवाही सुरु आहे. संबंधितांना दप्तर उपलब्ध करुन न दिल्यामुळे

५ कोटी ४७ लाख रुपयांच्या थकबाकीपैकी २ कोटी ७ लक्ष रुपये वसूल झाले आहेत. वसुलीची कार्यवाही सतत सुरु आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण किती प्रकरणे होती त्यापैकी वसुलीसाठी किती लोकांनी सहकार्य केले नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १९३ प्रकरणांमधील ११८ ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी जबाबदार होते. त्यापैकी २८ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले आहेत. दप्तर उपलब्ध न करुन देण्यासंदर्भातील काही प्रकरणे सन २०११ च्या होत्या. त्यावेळी १०० रुपये दंड होता. १०० रुपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. सन २०११ नंतर दप्तर उपलब्ध करुन न दिल्यास रुपये २५ हजार इतका दंड करण्यात आलेला आहे. १०० रुपये हा दंड कमी होता. आता २५ हजार रुपये हा दंड वाजवी आहे.

२५ हजार रुपयांचा दंड कर्मचारी भरतात. लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्यावर २५ हजार रुपयांचा दंड भरण्यास त्यांना काही अडचण येत नाही असे समितीने मत व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, पुणे या ठिकाणी समितीने भेट दिली होती त्यावेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पुणे जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ-मोठया रकमा वसुली बिना प्रलंबित आहेत. यासंदर्भात समितीने दिनांक २१ डिसेंबर २०१५ रोजी सादर केलेल्या चौथ्या अहवालामध्ये शिफारशी केली त्यानुषंगाने प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हापरिषदे मार्फत संबंधित जबाबदार कर्मचारी/ ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या होत्या. जिल्हा परिषद पुणे अंतर्गत एकूण ५०९ प्रकरणांपैकी ३१६ प्रकरणे हे संशयित अपहाराची आणि १९३ प्रकरणे लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध न करुन दिल्याची होती. ३१६ प्रकरणांमधील रु.७.५५,३२,१८२/- एवढया गुंतलेल्या रकमेपैकी दिनांक २३ जूलै २०१५ अखेर २,०७,९३,०३४/- एवढी रक्कम वसूल/समायोजित झालेली होती. मार्च २०१८ अखेर रु. ३,८९,२१,००३/- एवढी रक्कम वसूल/समायोजित झालेली आहे. उर्वरित रक्कम रु. २,७७,०००००/- लवकरात लवकर समायोजित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहिची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी.

उपरोक्त प्रकरणामध्ये ५७ कर्मचारी दोषी आढळून आले होते. त्यापैकी ३९ कर्मचाऱ्यावर प्रकरण स्वरुप प्रशासकीय दंडनीय व फौजदारी कारवाई करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १८ कर्मचाऱ्याविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्याच्या आत पाठविण्यात यावी . लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध करुन देणाऱ्या व्यक्ति विरुध्द स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या कलम ७ अन्वये कारवाई करण्यात यावी. तसेच लेखापरिक्षण करुन घेण्यात यावे. त्यानुसार रक्कम जास्त असल्यास २५०००/- रु दंड आकरणी नगण्य असल्याने रकमेचे स्वरुप पाहुन संबंधित कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ थोपविण्यात येऊन फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात आत पाठविण्यात यावी.

# परिशिष्ट "अ"

## शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट ६.१)

**मुख्यालयी न राहणा-या जिल्हा परिषदांमधील कर्मचा-यांविरुध्द कारवाई करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्र.अराप-२००८/प्रक्र-२३२/आस्था-९**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ जुलै,२००८.**

**पहाः** १) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.अराप-२०००/ प्र.क्र.३१३२/१५, दिनांक १४/११/२०००

२) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.अराप-२००५/ प्रक्र-५८०/आस्था-९, दिनांक ६/१/२००६

**शासन परिपत्रकः**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवाल तसेच २०००-०१ च्या वार्षिक अहवालातील परिच्छेदाच्या अनुषंगाने दिनांक ११/६/२००८ रोजी रायगड जिल्हा परिषदेच्या संदर्भात झालेल्या पंचायत राज समितीच्या बैठकीत शालेय शिक्षण विभाग व ग्राम विकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली. याबाबत चर्चा करताना समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, मुख्यालयी न राहणा-या शिक्षकांविरुध्द कारवाई करण्यात यावी. ग्राम विकास विभागाच्या उपरोक्त संदर्भीय क्र.(१) येथील दिनांक १४.११.२००० च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी मुख्यालयी राहणे अनिवार्य आहे व जे शिक्षक मुख्यालयी राहात नाहीत त्यांच्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशा सूचना देण्यात आलेल्या असल्याचे प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी साक्षीच्यावेळी माहिती पुरविली. तसेच चर्चेच्या ओघात अशीही माहिती सादर करण्यात आली की, मुख्यालयी न राहणा-या ग्रामसेवकांविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निर्देश उपरोक्त संदर्भिय क्रमांक (२) येथील दिनांक ६.१.२००६ च्या शासन परिपत्रकानुसार देण्यात आले आहेत. परंतु शिक्षक आणि ग्रामसेवक या व्यतिरिक्त जिल्हा परिषदांमधील इतरही कर्मचारी मुख्यालयात हजर राहात नाहीत असे समितीच्या निदर्शनास आल्यावरुन त्यांनी याबाबत नाराजी व्यक्त करुन शिक्षक आणि ग्रामसेवक यांच्याविरुध्द निर्गमित करण्यात आलेल्या कारवाईच्या आदेशांच्या धर्तीवर मुख्यालयी न राहणा-या जिल्हा परिषदांमधील इतर सर्व गट "क" व "ड" मधील कर्मचा-यांविरुध्दही कारवाईचे आदेश निर्गमित करण्याबाबत पंचायत राज समितीने सूचित केले आहे.

२. पंचायत राज समितीने केलेल्या वर नमूद सूचना स्वीकारुन शासन आता असे आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांमधील शिक्षक, ग्रामसेवक, इत्यादी जे कर्मचारी मुख्यालयी हजर राहत नसतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात यावी. अन्यथा, अशा कर्मचा-यांविरुध्द कारवाई न करण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्यात यावी आणि अशा मुख्यालयी न राहणा-या कर्मचा-यांचा घरभाडे

भत्ता रोखण्यात यावा. उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ नुसार अनुक्रमे शिक्षक व ग्रामसेवक यांच्यापुरते काढण्यात आलेले आदेश आता या शासन परिपत्रकान्वये जिल्हा परिषदांमधील मुख्यालयी न राहणा-या इतर सर्व गट "क" व "ड" मधील कर्मचा-यांनाही लागू करण्यात येत आहेत. हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याबाबत दक्षता घ्यावी.

हे परिपत्रक संगणक सांकेतांक क्र. २००८०७०५१२४४४३००१ अन्वये शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्रकाश डिलेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
कार्यासन आस्था-२,३,४,५,७,८,१०,११ व १२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कार्यासन आस्था -९)

(परिशिष्ट ६.२)

**घरभाडे भत्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागाती कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी वास्तव्य कर अनिवार्य करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः घभाभ-१०१५/प्र.क्र.१/सेवा-५**
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०७ ऑक्टोबर, २०१६.

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.सीपीए-१४८४/सीआर-१२७५/एसईआर-५, दिनांक २०.९.१९८४.
२) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेपूर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५.४.१९८८.
३) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.घभाभ-१०९०/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ५.२.१९९०.

**प्रस्तावना -**

ग्रामीण भागात कामाच्या मुख्यालयी वास्तव्य करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनाच शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २०.९.१९८४ अन्वये घरभाडे भत्ता अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. तथापि शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २५.४.१९८८ मधील परिच्छेद क्र.४ अन्वये, घरभाडे भत्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात विहित केलेली शर्त, ही तरतूद काढून टाकण्यात आली तसेच शासन निर्णय क्र:घभाभ-१०९०/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ०५.०२.१९९० मध्येही सुद्धा सदर अट काढून टाकण्यात आली.

वरीलप्रमाणे ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांसाठी घरभाडे भत्याच्या प्रयोजनासाठीची कामाच्या ठिकाणी राहण्यासंदर्भातील अट काढून टाकली असली तरी, पंचायत राज समितीने सन २००८ मध्ये दिलेल्या निर्देशास अनुसरून, ग्रामविकास व जलसंधारण विभागाने, त्यांच्या अधिनस्त, जिल्हा परिषदेअंतर्गत गट-क व गट-ड मधील जे कर्मचारी त्यांच्या मुख्यालयी राहत नसतील त्यांचा घरभाडे भत्ता व वेतनवाढ रोखण्यात यावी व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी अशा आशयाची परिपत्रके दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ रोजी निर्गमित केली. तथापि महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, जळगांव या प्राथमिक शिक्षकाच्या संघटनेने, ग्रामविकास विभागाच्या उपरोक्त दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ च्या परिपत्रकास व दिनांक १४.३.२०१४ च्या पत्रास मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.५८२२/२०१४ दाखल करुन आव्हान दिले. या याचिकेमध्ये दिनांक १९.१०.२०१५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने निष्कर्ष काढला आहे की, उपरोक्त परिच्छेदामधील शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ५.२.१९९०, परि.क्र.४ मधील तरतूद ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ च्या परिपत्रकामुळे अधिक्रमित होत नाही त्यामुळे याचिकाकर्ता संघटनेच्या सदस्यांना दिनांक ५.२.१९९० मधील परि.क्र.४ मधील तरतूदीनुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय असून सदर घरभाडे भत्ता रोखून ठेवला असल्यास तात्काळ अदा करावा असे देखील मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दिनांक १९.१०.२०१५ च्या आदेशाचा परामर्श घेवून पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

शासन निर्णय क्रमांक:वेपूर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५.४.१९८८ मधील व शासन निर्णय क्रमांक:घभाभ-१०८९/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ५.२.१९९० मधील "ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या

बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात, घरभाडेभत्त्याच्या पात्रतेसाठी विहीत केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे" ही तरतूद वगळण्यात येत आहे.

हे आदेश दि.०१.११.२०१६ पासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१००७१५४६४१७९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Devidasrao Londhe

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Under Secretary,
st=Maharashtra,
[illegible]
cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2016.10.07 11:47:59 +05'30'

(श्री.दे.लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
७. सचिव, मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
११. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१३. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
१६. आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी,
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
२२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२६. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
२७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२९. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
३०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३३. लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे/ औरंगाबाद
३४. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
३५. *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३७. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
३८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
३९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
४१. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
४२. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
४३. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
४४. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
४५. निवड नस्ती, कार्यासन सेवा-५.

*पत्राद्वारे.

# परिशिष्ट "ब"

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ९ मे , २०१८**

**स्थळः विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,

श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार)

डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. असिम कुमार गुप्ता, सचिव, ग्राम विकास विभाग,

श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

श्री. डी. एल. सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

श्री. गिरिष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. महेश सावंत, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. विशाल सोळंकी, आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे

श्री. पी. एस. कवटे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे

**जिल्हा परिषद, पुणे :—**

श्री. सुरज मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. महादेव घुले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक, डी. आर. डी. ए, पुणे

श्री. सुनिल खैरनार, कृषी विकास अधिकारी

श्री. चंद्रकांत गजभिये, मु. अ. व विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता

श्रीमती मैथिली झांजुर्णे, कार्यकारी अभियंता, बांधकाम,

श्री. एस. एस. कदम, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री. अमर माने, उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. गणपत मोरे, शिक्षणाधिकारी, जि.प.पुणे

श्री. अशोक थोरात, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. संदीप कोहिनकर, उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पंचायत)

---

**संक्षिप्त कार्यवृत्तः**

समितीने चौथ्या व पाचव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उपसचिव, ग्रामविकास विभाग, उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १२ जून , २०१८**

**स्थळः विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(८) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. ज. र. मेनन, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,

डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. वि. रा. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना विभाग

श्री. चं. प्र. जोशी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. म. म. सावंत, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. कि. पां. वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग

श्री. रा. ता. भालेवज, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग

डॉ. विजय भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा

श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, हिंगोली :-**

श्री. एम. पी. तुम्पोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. अ. म. देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

डॉ. प्रविणकुमार घुले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. अंकुश दुबल, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

डॉ. देविदास टेकळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. नितीन दाताळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. एस. आर. भागानगरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. संदीपकुमार सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली

श्री. गणेश वाघ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, हिंगोली

श्रीमती गिता गुठ्ठे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

---

**संक्षिप्त कार्यवृत्तः**

समितीने तिस-या व चौथ्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी विभागप्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधानसचिव, सार्वजनिक आरोग्यविभाग, सचिव,ग्रामविकास विभाग,सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,उप सचिव, महसूल व वनविभाग सह संचालक, आरोग्य सेवा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १९ जुलै , २०१८**

**स्थळः विधान भवन, नागपूर**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**विशेष निमंत्रितः**

(९) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(१०) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयः**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्तः**

समितीने बैठकीत पुणे व हिंगोली जिल्हा परिषदेसंदर्भात विधानमंडळास सादर केलेल्या तिस-या, चौथ्या व पाचव्या अहवालाच्या शिफारशींच्या अनुपालनार्थ तिस-या व चौथ्या अनुपालन अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.